कृषीवल
रायगड, सोमवार, दि. १५ जुलै २०२४
किंमत ४ ₹

## डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर शनिवारी पेनसिल्व्हेनिया येथे एका प्रचार कार्यक्रमात बोलत असताना अज्ञात हल्लेखोराने गोळ्या झाडल्या. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते प्रचार रॅलीला संबोधित करत होते. त्यावेळी हा हल्ला करण्यात आला. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कानाला चाटून गोळी गेली. त्यामुळे ते पटकन खाली कोसळले. गुप्तहेर खात्याने लगेच डोनाल्ड ट्रम्प यांना सुरक्षित केले. सीक्रेट सर्व्हिस आणि ट्रम्पच्या कार्यालयाने ते सुरक्षित असल्याचं सांगितलं आहे.

## ‘भुजबळांची नार्को टेस्ट करा’

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पक्षाच्या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी ओबीसी आरक्षणाच्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक उपस्थित राहिले नाहीत, त्यावरून हल्लाबोल केला. यावरुन महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून भुजबळांवर टीकेची झोड उगारण्यात आली आहे. भुजबळ नेहमी आपल्या सोयीचं राजकारण करतात. त्यामुळे हे नेमकं तपासलं तर भुजबळ कुणासोबत आहेत आणि ते कुणाच्या इशाऱ्याने बोलतात. त्यामुळे त्यांची नार्को टेस्ट केली पाहिजे, अशी बोचरी टीका विरोधी पक्षनेते विज वडेट्टीवार यांनी केली आहे.




# रायगडात नद्यांना पूर

## कुंडलिका, पाताळगंगा इशारा पातळीवर



### अंबा नदीने धोका पातळी ओलांडली

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

हवामान विभागाने रायगड जिल्ह्यात अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसेच जुलैअखेरपर्यंत अतिवृष्टी होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. गेल्या २४ तासांमध्ये अंबा नदीने धोका पातळी ओलांडली असून, कुंडलिका, पाताळगंगा या नद्या इशारा पातळीच्या पुढे वाहत आहेत. मुरुड, पेण, तळा आणि पोलादपूर पूरगस्त आणि दरडग्रस्त गावातील ६६ कुटुंबांतील २०५ नागरिकांचे सहा कॅम्पमध्ये स्थलांतरीत केले आहे. तसेच ३६ कुटुंबांतील १३१ नागरिकांना त्यांच्या नातेवाईकांकडे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

मुसळधार पडत असलेल्या पावसाने अंशतः ३९ कच्च्या घरांचे तर, पाच पक्क्या घरांचे नुकसान झाले आहे. मुरुड तालुक्यातील ३२ घरांचे छप्पर उडाले आहे. मुंबई-पुणे महामार्गावर कलोते गावाजवळ पावसाचे पाणी साचल्याने एक एसटी बस अडकली होती. सर्व प्रवासी सुखरुप आहेत. आपटा-खारपाडा पनवेल मार्गावर पाणी आल्याने वाहतूक प्रभावित झाली. पेण तालुक्यातील खालचा पाडा डोलवी येथील भरत नारायण म्हात्रे यांच्या घराच्या चारही बाजूने •› पान २ वर


## कोकण रेल्वे मार्गावर दरड कोसळली

**रत्नागिरी :** कोकण रेल्वेच्या मार्गावर दिवाणखवटी आणि खेडदरम्यान मार्गावर दरड कोसळली.त्यामुळे त्याठिकाणी कोकण रेल्वेची वाहतूक रोखण्यात आली होती. बाकी मार्गावरील वाहतूक सुरू होती. दोन ते अडीच तासांनंतर दरड दूर करण्यात प्रशासनास यश आल्याची माहिती कोकण रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी दिली. दरम्यान, प्रवाशांची रखडपट्टी होऊन त्यांचे हाल झाले.

## नेरळ-माथेरान घाटात दरड कोसळली

**। नेरळ । वार्ताहर ।**

सतत दोन दिवस कोसळणाऱ्या पावसामुळे रविवारी पहाटेच्या सुमारास नेरळ-माथेरान घाटात दरड कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु, रस्त्यावर मोठ मोठे दगड आल्याने काही काळ रस्ता बंद झाला होता. स्थानिक टॅक्सी चालकांना समजल्यानंतर त्यांनी त्वरित हा रस्ता मोकळा करण्यासाठी प्रयत्न केले. आणि हा रस्ता मोकळा झाल्या त्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.



माथेरान घाटात अनेक ठिकाणी दरड कोसणारा भाग आहे. तिथे संरक्षक जाळी बनवावी •› पान २ वर

## ‘जगबुडी’ धोका पातळीवर

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

खेडमध्ये जगबुडी नदीने धोक्याच्या पातळी ओलांडली आहे. खेड मार्केट परिसरात जगबुडी नदीचे पाणी शिरल्याने नागरिकांची दाणादाण उडाली आहे. पावसाचा जोर वाढल्यास खेडमध्ये पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. खेड नगर परिषदकडून नागरिकांना खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या. गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार बरसत असणाऱ्या पावसाने जगबुडी •› पान २ वर

## महामार्ग सहा तास ठप्प

**। वाकण-पाली । वार्ताहर ।**

राज्यमहामार्गावरपाली अंबानदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर सखल भागात पाणी भरले होते. यामुळे सकाळपासून येथील दोन्ही बाजूची वाहतूक तब्बल सहा तास ठप्प होती. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. तसेच याच मार्गावर बलाप गावाजवळही रस्त्यावर पाणी साचल्याने तेथेही वाहतूक खोळंबली होती. दुपारी एकनंतर पाणी ओसरल्यावर वाहतूक



सुरू झाली.

पालीवरून वाकणकडे व वाकणवरून पालीकडे येणारी वाहतूक बंद झाली होती. खासगी वाहने, एसटी बस, ट्रक, टेम्पो आदी मालवाहू वाहने •› पान २ वर



## चिंचोटी डोंगराला पडल्या भेगा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट असून, मुसळधार पावसाने अलिबाग तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. सुरुवातीच्याच पावसात तालुक्यातील चिंचोटी गावाच्या लागत असणाऱ्या डोंगराला भेगा पडल्याने येथे भूस्खलन होण्याची शक्यता आहे. सावधगिरीचा पर्याय म्हणून या डोंगर परिसरातील नागरिकांना स्थलांतरित होण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. चिंचोटीच्या डोंगराला पडलेल्या भेगा या डोंगराखाली झालेल्या माती उत्खननामुळे येथील जमीन सरकत आहे. होणाऱ्या उत्खननाकडे वन विभागाने दुर्लक्ष केल्याने दरड कोसळण्याचे संकट ओढवणार असल्याचे पर्यावरण तज्ज्ञाचे मत आहे.

गतवर्षी अलिबाग तालुक्यातील ताजपूर गावाच्या पूर्वेकडील बाजूला असणाऱ्या डोंगरातील दरड कोसळली होती. यावेळी प्रशासनाने ग्रामस्थांना सावधगिरीचा इशारा देत स्थलांतर करण्याच्या सूचना



- भूस्खलन होण्याची ग्रामस्थांना भीती
- उत्खननामुळे ओढवणार आपत्ती
- वनविभागाच्या दुर्लक्षामुळे संकट

दिल्या होत्या. गतवर्षी खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळण्यापूर्वीची माहिती समोर आली तेव्हा त्या ठिकाणीदेखील झालेले उत्खनन आणि डोंगराला पडलेल्या भेगा याच आपत्तीला कारणीभूत ठरल्या •› पान २ वर

## कसारा घाटात कंटेनरची सात वाहनांना धडक



### १३ प्रवासी जखमी

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

एकीकडे मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूरजवळ मोठी वाहतूक कोंडी असतानाच दुसरीकडे कसारा घाटात वाहनांचा विचित्र अपघात झाला. एका कंटेनरने ६ ते ७ वाहनांना धडक दिली. या भीषण अपघातात सुमारे १३ ते १४ प्रवासी जखमी झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिकच्या कसारा घाटात विचित्र अपघात झाला आहे. एका कंटेनरने ६ ते ७ वाहनांना धडक दिली असून, यात सुमारे १३ ते १४ प्रवासी जखमी झाले आहे. कंटेनरचे ब्रेक फेल झाल्यामुळे अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अपघातामुळे काही काळ कसारा घाटात वाहतूक कोंडी झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस अपघातस्थळी दाखल झाले. जखमींना नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## मृत्यूनंतर न्याय

### प्राचार्यांना अटक करण्याचे कोर्टाचे आदेश

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश अनंत ठाकूर यांना ठाणे येथील फौजदारी न्यायालयाने अटक करण्याचे आदेश दिले आहेत.

महात्मा फुले कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयात काम करणाऱ्या अनिल जगे यांना २००६ साली कामावरून निलंबित करण्यात आले होते. जगे यांना निलंबित करताना महाविद्यालय प्रशासनाने कोणतीही चौकशी करण्याची तसदी न घेता अनिल जगे यांना जबरदस्तीने संस्थेच्या सचिवाला लेखी पत्र देण्यास •› पान २ वर

## ।। जीव झाला कासावीस, रुप दाव विठ्ठला ।।

● विठ्ठलाच्या भेटीसाठी वारकऱ्यांचा जीव कासावीस झाला असून, पंढरपूरच्या ओढीने वाऱ्यांचे प्रस्थान आषाढीनिमित्त होणार आहे. दरम्यान, माळसिरस येथील गोल रिंगण पार पडल्यानंतर टाळ-मृदुंगाचा ब्रह्मनाद टिपेला गेल्याचे दृश्य आपल्या कॅमेऱ्यात कैद केलेय छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी.



### भोईर दाम्पत्य अन्य शेतकऱ्यांसाठी आदर्शवत

# जिताडा व्हीलेजमध्ये मत्स्यशेती बहरली

**आविष्कार देसाई**

**। रायगड ।**

अलिबाग तालुक्यातील शहापूर-धेरंड परिसरातील जमिनी या प्रकल्पात अडकल्या आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना ना नोकरी, ना रोजगार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, असे असताना शहापूर येथील पूनम भोईर आणि सचिन भोईर या दाम्पत्याने भातशेतीमध्येच दुपिकी मत्स्यशेतीचा प्रयोग यशस्वी केला आहे. सुरुवातीला लोकांनी त्यांना वेड्यात काढले होते. त्यांनी मांडलेल्या आर्थिक गणितानुसार मत्स्यशेतीच्या माध्यमातून वर्षाला किमान १५ लाख •› पान २ वर





“एप्रिल महिन्यात तलावांचे पाणी आटते तेव्हा खार वाढते व मासे मरतात. त्यामुळे मासे विकावे लागतात. याच वेळेस जर गोड्या पाण्याची सोय झाली, तर मासे जगू शकतात. पुढे हाच मासा २ ते १२ किलो वजनापर्यंत वाढतो. आमचे क्षेत्र १९७९ पासून अंबा खोरे डावा कालव्याचे लाभ क्षेत्र आहे. पण, आम्हास पाणी न देता ते खाडीत सोडले जाते. हेच पाणी आम्हास दिले तर आम्ही एकाच वेळेस तीन पिके घेऊ. – अरुण पाटील”

**वर्षभरात लाखोंची कमाई होईल**

फेब्रुवारी ते एप्रिल या कालावधीत हाच मासा ५०० ग्रॅम ते १ किलोपर्यंत होतो. ७०० रुपये किलो दराने याची विक्री होते. एक एकरात ३०० जिताडा मासे सरासरी ७०० ग्रॅमचे विक्री करून सरासरी ५०० रुपयांप्रमाणे किमान १५ लाख रुपयांचे उत्पन्न एका वर्षात प्राप्त होऊ शकते, याकडेही पूनम भोईर यांनी लक्ष वेधले.

## सिडकोच्या माध्यमातून शासनाचा भूमीपुत्रांवर अन्याय

### गावातील भूखंड विकासकाला देण्यास ग्रामस्थांचा विरोध

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

शासन सिडकोच्या माध्यमतून स्थानिक भूमीपुत्रांवर अन्याय करीत असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांचे नेते राजाराम पाटील यांनी केला आहे. खारघरमध्ये समाविष्ट खुटुक बांधन गावाच्या शेजारी असलेला भूखंड सिडकोने ग्रामस्थांच्या मागणीचा विचार न करता परस्पर विकासकाला दिला आहे. विकसकाला दिलेला हा भूखंड ग्रामस्थांना परत न दिल्यास सिडकोविरोधात आंदोलन करण्याचा त्यांनी दिला आहे.

खुटुक बांधण गावाच्या शेजारी सेक्टर ३७ येथील भूखंड क्रमांक ४ हा भूखंड सिडकोने एका विकासकाला



दिला आहे. हा भूखंड विकासकाला देण्यात ग्रामस्थांचा विरोध असून, हा भूखंड ग्रामस्थांना मैदान म्हणून मिळावा याकिता तत्कालीन ग्रामपंचायतीने ठराव केला होता. तशा प्रकारचे पत्र मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे दिले होते. तसेच सिडको प्रशासनासोबतदेखील तशा प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात आला होता. तसे असतानादेखील विकासकाला भूखंड देण्यात आल्याने खुटुक बांधण •› पान २ वर

# शेडुंग टोलनाक्याजवळ जीवघेणी वाहतूक

## वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**
**मुंबई-पुणे महामार्गावर असलेले अजिवली ते पळस्पे या दोन्ही बाजूने येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गाला जोडणारा पनवेल प्रवेशद्वार, जेएनपीटीवरून येणाऱ्या-जाणाऱ्या रस्त्यावर होणाऱ्या मोठ्या वाहतूक कोंडीने मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.**

अजिवली ते पळस्पे हा रस्ता जिथे जोडतो, त्या ठिकाणी अतिक्रमणे होऊन रस्ता अरुंद होतो. जीवघेण्या वाहतुकीच्या कोंडीत अटकलेला वाहन चालक प्रवासी १ ते २ तास यात अटकून असतो. तांत्रिक दृष्टीने पाहिले असता रस्त्यालगत वाढणारी अतिक्रमणे ज्यात अडचण निर्माण करणारे पेट्रोल पंपाने पेट्रोल भरण्यासाठी उभे केलेले शेकडो टँकर, ट्रेलर तसेच व्यावसायिक म्हणून रेतीच्या बॅगा ठेवलेले व्यापारी, बांबू विक्रेते, फर्निचर, नर्सरीवाले, रेती खडी आणणारे अनेक मालवाहतूक ट्रक, वेगवेगळ्या धंद्याच्या हातगाड्या लावल्या असून, या सर्व बाबींवर दुर्लक्ष करून प्रशासनाचा कुठलाही अंकुश यावर दिसत नसल्याने नागरिकांना होणारा त्रास भविष्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत अनेकांचा जीव घेऊ शकतो.



वाहतूक पोलिसांचे कार्यालय व गस्त अगदी हाकेच्या अंतरावर असतानासुद्धा या सर्व बाबींकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे हजारो वाहन चालक व रहदारी करणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या तक्रारी अनेक वेळा माध्यमातून ऐकायला पाहायला मिळतात. भविष्यातील ही असहनीय त्रासदायक असुरक्षित व अनियोजित असलेली वाहतूक कोंडी वैद्यकीय उपचाराच्या वेळी एखाद्याच्या जीव जाईल अशी आहे. अनेक वेळा माध्यमातून आवाज उचलला असतानाही काही मिनिटाच्या प्रवासासाठी दोन दोन तास उभे राहून प्रवाशांना जीव मुठीत ठेवावा लागत असल्याने आंदोलन मोर्चा करून प्रशासनाच्या निषेधार्थ नागरिकांचा असंतोष पाहता मुंबई-पुणे महामार्ग अडवल्याशिवाय स्थानिक नागरिक शांत बसणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांसह वाहनचालकांकडून व्यक्त होत आहे.

## महिलेची सव्वाचार कोटींची फसवणूक

**पनवेल :** खारघरमध्ये राहणाऱ्या एका महिलेला शेअर बाजारात रक्कम लावल्यास अधिकचा नफा मिळेल, असे आमिष दाखवून तब्बल सव्वाचार कोटी रुपयांची फसवणूक ऑनलाईन पद्धतीने भामट्यांनी केली आहे. खारघरमधील केशर हार्मोनी या इमारतीमध्ये राहणाऱ्या सूचेता अरुण पौडवाल यांना भामट्यांनी शेअर बाजारात खरेदी-विक्री केल्यास सर्वाधिक नफा मिळेल यासाठी भामट्यांनी संपर्क साधला.

२८ एप्रिल ते ७ जुलैदरम्यान भामटे सूचेता यांच्या संपर्कात होते. सूचेता यांनी ४ कोटी ४० लाख २५ हजार एवढी रक्कम गुंतवली होती. त्यापैकी ५ लाख ९३ हजार ५५७ रुपये त्यांना परत मिळाले. उर्वरित ४ कोटी ३४ लाख ३१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याने सूचेता यांनी पोलीस ठाणे गाठले. सूचेता यांना ॲडवेन्ट इंटरनॅशनल डी - ८७५ या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये भामट्यांनी सहभागी करुन घेतले होते. याबाबत नवी मुंबई पोलिसांचे सायबर सेलचे पोलीस पथक विशेष तपास करत आहे.

# इंडोनेशियाच्या पर्पल राईसची पनवेलमध्ये लागवड

## मिनेश गाडगीळ यांचा शेतीप्रयोग

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील गुळसुंदे गावातील प्रगतीशील शेतकरी, कृषीभूषण मिनेश गाडगीळ यांनी आपल्या शेतामध्ये पर्पल राईस म्हणजेच इंडोनेशियातील थायोमल्ली जस्मीन भाताची लागवड केली आहे. हा तांदूळ विशेषतः लहान मुलांसाठी उपयुक्त आहे.

गुळसुंदे येथील प्रगतीशील शेतकरी महाराष्ट्र राज्य कृषीभूषण मिनेश गाडगीळ यांनी आपल्या शेतामध्ये विविध प्रयोग करुन आतापर्यंत अनेक नाविन्यपूर्ण उत्पादने घेतलेली आहेत, ज्यामध्ये ड्रॅगनफ्रुट, स्ट्रॉबेरी, लाल तांदूळ, काळा तांदूळ, बासमती, आंबेमोहर, डायबेटीससाठीचा आरएनआर तांदूळ, कलर कलिंगड व मस्कमेलन इत्यादींचा समावेश आहे.



आपल्याकडे यशस्वी झालेले उत्पादन इतरही परिसरातील शेतकऱ्यांनी घ्यावे यासाठी त्यांचा सतत प्रयत्न चालू असतो, जेणेकरुन पारंपरिक पिकांबरोबर नाविन्यपूर्ण उत्पादने घेतल्यास शेतकऱ्यांचा अर्थिक स्तर उंचावेल. यावर्षी मिनेश गाडगीळ यांनी निळा तांदूळ इंडोनेशियातील, थायोमल्ली जस्मीन राईस जो लहान मुलांसाठी विशेष करुन उपयुक्त व परपल राईस लेबेनिया येथील आपल्या शेतात लागवड केलेला आहे. साधारण ३० ते ४० क्विंटल एकरी उत्पादन देणाऱ्या या जाती असून, अनेक गुणधर्म या तांदळात आढळून येतात. ज्यामध्ये कमी ग्लॅयसेमिक इन्डेक्स, ॲन्टी ऑक्सीडन्ट इफेक्ट, ॲन्टी कॅन्सर इफेक्ट, विशेष प्रकारचा सुवास, शिजण्यासाठी कमी कालावधी इत्यादी व नैसर्गिक पिग्मेंटमुळे येणाऱ्या विविध रंगांमुळे ग्राहकांची यास विशेष पसंती असल्याचे निदर्शनास आले आहे. वरील तांदूळ हा कोकणात पहिल्यांदाच घेतला गेला असून, पर्पल राईस हा राज्यात पहिल्यांदाच तयार होइल व पीक तयार झाल्यानंतर वरील जातींचे बियाणे तयार करुन ते आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना आपण उपलब्ध करुन देऊ, असा आशावाद मिनेश गाडगीळ यांनी व्यक्त केला.

# टोमॅटोचे दर भिडले गगनाला

**। सोगाव । वार्ताहर ।**

सध्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. मुंबईत टोमॅटोचे दर १०० ते १२० रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहेत. तर, अलिबाग तालुक्यातील वायशेत येथील रविवारच्या आठवडा बाजारात ७ जुलै रोजी चांगल्या दर्जाचे टोमॅटो किरकोळ ९० ते १२० रुपये किलो दराने विक्री होताना दिसून आले. यावेळी बाजारात टोमॅटो खरेदीदारांनी नाराजी व्यक्त करत हात आखडता घेतला होता.



गेल्या आठवडाभरापासून राज्यात सुरू असलेल्या पावसामुळे टोमॅटोच्या पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. त्याचा परिणाम टोमॅटोच्या दरावर दिसून येत आहे. भाजी मंडईमध्ये टोमॅटोची आवक कमी होत असल्याने पुढील काही दिवस टोमॅटोचे दर चढेच राहणार असल्याचे भाजी विक्रेते राजा पाटील यांनी सांगितले. तसेच पुढील काळात पावसामुळे इतर भाज्यांची आवक कमी होणार असल्याने बहुतांश भाज्या महागणार असल्याचे भाजी विक्रेत्यांनी सांगितले आहे.

## वाहतूक शाखेकडून चालकांचे प्रबोधन

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत गव्हाण फाटा वाहतूक शाखेकडून चालकांना मद्यप्राशन करून वाहन न चालवणे तसेच चालत्या वाहनात मोबाईलचा वापर न करणे तसेच अवजड वाहन डाव्या बाजूस चालवण्याबाबत मार्गदर्शन करून प्रबोधन करण्यात आले.

यावेळी नवी मुंबईचे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक श्रीमती गलांडे, पो.ह. पाटील, पो.कॉ. अवताडे आदींनी वाहनचालकांचे प्रबोधन केले.

# पावसाने भातशेतीचे नुकसान



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गेले दोन ते तीन दिवस उरण तालुक्याला पावसाने झोडपले असून, त्याचा परिणाम ग्रामीण भागातील जनतेवर झाला असून, ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

तालुक्यात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील नदी नाल्यांना पूर येऊन उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, मोठीजुई, विंधणे, दिघोडे, आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन, खोपटे, चाणजे, नागाव, केगाव आदी भागातील काही शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधांना खांडी जाऊन, पाणी भातशेतीत घुसले आहे. त्यामुळे भात शेतीतील रोपे कुजून जाण्याची शक्यता आहे. तर पाण्यासोबत वाहून आलेल्या गाळाखाली रोपे गाडली जाण्याची शक्यता काहीशी निर्माण झाली आहे.

भातशेतीत पाणी शिरल्यामुळे शेतीची कामे ठप्प होऊन, लावण्या खोळंबल्या आहेत. नांगरणीची कामे देखील थांबली आहेत. त्यातच गेल्या आठवडाभरापासून, खताचा तुटवडा, मजुरांचा अभाव आणि पावसाचा कहर यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आता दोन ते तीन दिवस जोरदार पाऊस पडत असल्याने, पावसाचे पाणी शेतात घुसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

## झाड पडून स्कूल व्हॅनचे नुकसान



**। पनवेल । वार्ताहर ।**

मुसळधार पावसामुळे स्कूल व्हॅनवर झाड पडून व्हॅनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. नवीन पनवेल सेक्टर १३ येथील समाज मंदिर बाजूस असलेल्या गार्डनमधील झाड पावसामुळे रस्त्यावर पडून रिकामी स्कूल व्हॅन त्याखाली सापडल्याने स्कूल व्हॅनचे मोठे नुकसान झाले आहे.

पान १ वरून

## रायगडात नद्यांना पूर

पाणी साचले आहे. घरातील ५७ वर्षीय भरत म्हात्रे आणि विशाखा म्हात्रे वय ५४ वर्ष यांना सुखरुप बाहेर काढण्यात आले आहे. सध्या ते त्यांचे नातेवाईक प्रशांत माळी यांच्याकडे राहणार आहेत. पोलादपूर तालुक्यातील चिरेखिंड ते आंबेमाची रस्त्यावर दरड कोसळल्याने वाहतूक बंद होती. दरड हटवण्याचे काम सुरु होते. तसेच कर्जतमधील नेरळ-कळंब रस्त्यावरील दहीवली पुलावरुन पाणी जात असल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे.

अंबा नदीची इशारा पातळी ८ मीटर आहे. तर धोका पातळी ९ मीटर आहे. ती ८.२० मीटरवरून वाहत आहे. कुंडलिका नदीची इशारा पातळी २३ मीटर आहे. तर धोका पातळी २३.९५ मीटर आहे. ती २३.८५ मीटरवरून वाहत आहेत. पाताळगंगा नदीची इशारा पातळी २०.५० मीटर आहे. तर धोका पातळी २१.५२ मीटर आहे. ती सध्या २०.५० मीटरवरून वाहत आहे. पावसाचा जोर कायम असल्याने तीनही नद्या कुठल्याही क्षणी धोका पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन विभागाने नदी किनाऱ्यांवरील गावांना आणि शहरांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. सखल भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाडच्या सावित्री नदीच्या पातळीत वाढ झाली असली तरी तिने अद्याप इशारा पातळी ओलांडलेली नाही. जिल्ह्यातील दरडप्रवण आणि पूरप्रवण गावांवर जिल्हा प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रित केले आहे. या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी श्री. जावळे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची काल रात्री दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन प्रशासनाच्या तयारीचा, उपाययोजनांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, जिल्हा प्रशासन कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत शिबिरे म्हणून वापरता येतील अशा इमारती प्रशासनाने ओळखल्या आहेत. तहसीलदारांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध असतील याची खात्री करण्यास सांगितले आहे. आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचेही सांगितले.

पुढील काही दिवस रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्हा प्रशासनाने गाफील न राहता पुढील काही दिवस कमालीची सतर्कता बाळगावी, तसेच कुठल्याही परिस्थितीत अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालय सोडू नये. आपल्या क्षेत्रातील सर्व धोकादायक स्थळंचा अभ्यास करून आपत्ती उद्‌भवल्यास करावयाच्या उपाययोजनासाठी कृती आराखडा तयार ठेवावा.

## पाताळगंगाने गाठली धोक्याची पातळी

**रसायनी :** शनिवारपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे पाताळगंगा नदीने रविवारी सकाळी धोक्याची पातळी गाठली असून, पुढेही पावसाची मुसळधार सुरूच राहिली तर पाताळगंगा नदीला पूर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पावसाची सतत मुसळधार सुरु असून रसायनीसह तालुक्याला चांगलेच झोडपले आहे. ठिकठीकाणी पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले. रविवारी मोहोपाडा आठवडी बाजार असल्याने भरगच्च भरणारा बाजार दुपारपर्यंत सामसूम दिसत होता. दांड रसायनी रस्त्यावर काही सखल भागात पाणी साचल्याने ये-जा करणाऱ्या प्रवाशांना व पादचाऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. रविवारी सकाळपासूनच पावसाची मुसळधार सुरुच असल्याने रसायनीकरांनी महत्त्वाच्या कामाव्यतिरिक्त घराबाहेर जाण्याचे टाळले.

## नागोठण्यात पुराचे पाणी

**नागोठणे :** अंबा नदीचे पुराचे पाणी येथील ऐतिहासिक जुन्या पुलावरून गेल्याने वाहतूक बंद झाली. त्यामुळे नागोठण्याचा वरवठणे गावाशी संपर्क तुटला. तसेच येथील एस.टी. स्थानकासहीत लगतच असलेल्या टेम्पो स्टँड परिसरात, कोळीवाडा, बाजारपेठ व नागोठणेहून पेणकडे जाण्यासाठी असलेल्या गावातील मुख्य रस्त्यावर लेकव्ह्यू हॉटेल समोर व महाड बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर मरीआईच्या मंदिरासमोर अशा दोन्ही बाजूकडील रस्त्यावर पुराचे पाणी आले होते. नागोठणे स्थानकात पाणी आल्याने एस.टी. वाहतूक नागोठण्यातील हायवेनाका येथून सुरू होती. याशिवाय नागोठण्याजवळील कोलेटी, शेतपळस गावाच्या परिसरातही पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. पुराचे पाणी वाढत असल्याने नागोठणेतील छ. शिवाजी महाराज चौक परिसरासह नागोठणे बाजार पेठेतील सर्व दुकानदार व नागरिकांनी तसेच आंबा नदी व खाडी किनारील गावचे ग्रामस्थांनी दक्षता बाळगून पाण्याची पातळी व परिस्थिती पाहून आपल्या कुटुंबासह सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावे असे आवाहन नागोठणे ग्रामपंचायत व पोलीस यंत्रणेकडून करण्यात आले होते. तर नगोठण्यातील कोळीवाडा, लेकव्ह्यू हॉटेल परिसरातील वीज ट्रान्सफॉर्मरच्या ठिकाणी पुराचे पाणी आल्याने तेथील वीजपुरवठा सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद करण्यात आला होता.

अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडून नागोठण्यात पुराचे पाणी येण्यास सुरुवात झाल्याने येथील छ. शिवाजी महाराज चौक परिसरातील सर्व लहान-मोठे दुकानदार व बाजारपेठेतील दुकानदारांनी आपल्या सामानाची सुरक्षित स्थळी हलवाहलव करण्यास सुरुवात केली होती, तर नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्यासोबत पोलीस ठाण्याचे कर्मचारी, नागोठणे मंडळ अधिकारी भरत गुंड, तलाठी सचिन संबरी तसेच नागोठणे ग्रामपंचायतीचे कर्मचारी पूरपरिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

## ‘जगबुडी’ धोका पातळीवर

नदीने धोका पत्री ओलांडली. यामुळे जगबुडी नदीला मिळणाऱ्या नारंगी व इतर नद्यांनी देखील आपली पातळी ओलांडली आहे. यामुळे नदीतील पाणी दापोली खेड मार्गांवरील पुलावर आल्याने खेड-दापोली मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने म्हणजे कुंभारवाडा डेंटल कॉलेज यामार्गे वळवण्यात आली आहे. संततधारपणे कोसळणाऱ्या पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास खेड शहरात पुन्हा पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते.

## नेरळ-माथेरान घाटात दरड कोसळली

अशी मागणी माथेरान नागरिकांसह पर्यटकांकडून अनेक वर्षांपासून होत आहे. असे असताना आजपर्यंत यावर कायमस्वरूपी उपाययोजना होताना दिसत नाही. काही ठिकाणी संरक्षक जाळी बसवली आहे. परंतु, ज्या ठिकाणी दरडीचा धोका असे अशा सर्वंच ठिकाणी या संरक्षक जळ्यांची आवश्यकता आहे. त्यामुळं स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच प्रशासने यावर लक्ष केंद्रित करून हा धोका दूर करावा, अशी मागणी होत आहे.

## महामार्ग सहा तास ठप्प

अडकून पडली होती. रविवार असल्याने शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयांना सुट्टी असल्यामुळे विद्यार्थी व चाकरमानी या कोंडीतून सुटले. मात्र, इतर प्रवासी व स्थानिक नागरिकांचे हाल झाले. पाली-वाकण मार्गावरच बलाप गावाजवळ वळणावर मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले होते. या पाण्यातून काही वाहने धोकादायकपणे जात होती. मात्र, छोटी वाहने अडकून पडली होती. नवीन पूल बांधला तरी कसा आणि कशासाठी? असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.

## सिडकोच्या माध्यमातून शासनाचा भूमीपुत्रांवर अन्याय

परिसरातील ग्रामस्थ सिडको विरोधात आक्रमक झाले असून, उपोषण आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याकरिता रविवारी (दि. १४) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना प्रकल्पग्रस्तांचे नेते राजाराम पाटील यांनी शासनाच्या भूमिकेवर टीका केली असून, शासन सिडकोच्या माध्यमातून स्थानिक भूमीपुत्रांवर अन्याय करत असल्याचा आरोप केला आहे.

## मृत्यूनंतर न्याय

भाग पाडण्यात आल्याचे जगे यांचे म्हणणे होते. आणि अत्यंत बेकायदेशीररित्या सदर पत्रात करण्यात आलेले सर्व आरोप मान्य आणि कबूल आहेत असे लिहून घेण्यात आले होते. याबाबत सहा वर्षांनंतर महाविद्यालयातल्या जन माहिती अधिकारी यांच्या नावाने माहिती विचारण्यात आली तेव्हा महाविद्यालयात जन माहिती अधिकारी या पदाची स्थापना करण्यात आली नव्हती. २००६ पासून जगे यांना निर्वाह भत्ता प्राप्त न झाल्याने कुपोषणामुळे अखेर त्यांचा मृत्यू झाला; परंतु मृत्यूपूर्वी त्यांनी महाविद्यालयाचा क्रूर अत्याचार आणि अन्याय ठाणे न्यायालयाच्या निर्देशास आणून दिला. वास्तविक, सन २०१० साली जगे यांना पूर्ववत कामावर घेऊन पूर्वीची २००६ पासूनची सर्व थकीत थकबाकी देण्याचा स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले होते. परंतु, शिक्षण संस्थेने हा आदेश पूर्णपणे अंमलबजावणी करण्यास नकार दिला, त्यामुळे न्यायालयाने प्रा. गणेश ठाकूर या आरोपीला अटक करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशाबद्दल जगे यांच्या जासई या गावातील ग्रामस्थांनी स्वागत केले असून, जगे यांच्या पत्नी अनिता जगे यांनी दोन दशक न्यायालयात दिलेल्या लढ्याबाबत त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जिताडा व्हीलेजमध्ये मत्स्यशेती बहरली

रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. भोईर या शेतकरी दाम्पत्याचा आदर्श अन्य शेतकऱ्यांनी घेतल्यास त्यांनादेखील हुकमी आर्थिक आयाम उपलब्ध होतील.

तीलापिया, कटला, रोहू, खोल, पापलेट या सर्वच माशांना खाद्य उसने द्यावे लागते. त्याचा प्राथमिक खर्च करण्याइतके पैसे सामान्य शेतकऱ्यांकडे नसतात. परिणामी, योग्य वेळेत मासे वाढत नाहीत. जिताडा हा असा मासा आहे की तो उसन्या खाद्यावर जगत नाही, तर तो स्वतःचे भक्ष्य स्वतः शोधतो. उत्पन्नप्राप्तीसाठी अशा माशाची निवड केली पाहिजे. पण, त्याचे बीज महाग आहे. साधारण १२ ते २५ रुपयांना एक नग मिळतो.

जिताड्याची पिल्ले लावणीच्या वेळेस शेतात सोडली, तर शेतातील लहान मासे खाऊन जिताडा जगू शकतो आणि मोठा होऊ शकतो. म्हणून कोरोनाच्या काळात हा प्रयोग करण्यात आला होता. हाच प्रयोग अरुण अर्जुन पाटील यांनीदेखील केला आहे.

जुलै महिन्यात एका एकरात ५०० जिताडा पिल्ले याप्रमाणे पाच एकरात हा पथदर्शी प्रयोग केला गेला. शेतात भाताचे पीक तर खाली मासे आणि बांधावर भाजीपाल्याची शेती ही अतिशय युनिक कन्सेप्ट आहे.

बीज विकत घेण्यासाठी बँक ऑफ बडोदाने किसान क्रेडिट कार्डद्वारे सुमारे पाच लाखांचे कर्ज दिले. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यामध्ये कापणीच्या वेळी मासे पकडले तेव्हा ७० टक्के मासे जिवंत सापडले. सरासरी त्यांचे वजन २०० ग्रॅम आढळले. या माशांना कुठलेही खाद्य देण्यात आले नाही. पकडलेले मासे पुन्हा मत्स्य तलावात टाकले. पुढे या माशांना खाद्य म्हणून एकरी १० किलो तीलापिया मासे देण्यात आले. जे मासे दर तीन महिन्यांनी प्रजनन करतात. तीलापियाची लहान पिल्ले जिताड्याचे आवडते खाद्य आहे, असे पूनम भोईर यांनी सांगितले.कापणीच्या वेळेस तयार जिताडी जरी विकली तरी ६० हजार रुपयांचे उत्पन्न तीन महिन्यात प्राप्त होते. हा प्रयोग यशस्वी झाला असून, आता चार शेत आणि पाच तलाव भाड्याने घेऊन हा व्यवसाय शहापूरला करीत असल्याचे सचिन भोईर यांनी सांगितले.

### ..तर मोठी आर्थिक क्रांती

एमआयडीसीने शहापूरला ३८७ हेक्टर जमीन संपादन केली आहे. गेली १६ वर्षे ती तशीच पडून आहे. ना रोजगार, ना शेती, अशा परिस्थितीत यातील भागीदारी तत्त्वावर ५० टक्के जमीन मत्स्य तलावाखाली आणली तर मोठी आर्थिक क्रांती होऊ शकते, असा विश्वास तरुण उद्योजक सुधीर पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## चिंचोटी डोंगराला पडल्या भेगा

आता चिंचोटी गावातील डोंगराला भेगा पडल्या आहेत. चिंचोटी डोंगरावर वनविभागाने अनेकदा वृक्षारोपण केले आहे. यामुळे या डोंगरावर माती घट्ट पकडून ठेवणारी झाडे आहेत. परंतु, ज्या ठिकाणी डोंगराला भेगा पडल्या आहेत. त्या डोंगराच्या पायथ्याशी वनविभागाच्या डोळ्यात धूळ फेकून मातीचे उत्खनन करण्यात आले आहे. यामुळे डोंगराची माती वरच्या बाजूने सैल पडली असल्याचे गावातील राकेश पाटील यांनी सांगितले.

भेगा पडलेल्या डोंगराच्या पायथ्याची लोकवस्ती नाही. लोकवस्ती तेथून दूर आहे. परंतु, दरड कोसळण्याची भीती लक्षात घेता त्या घरातील नागरिकांना स्थलांतर करण्यासाठीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. येथे घरे नसली तरी तब्बल दोन हेक्टर शेतजमीन दरडीखाली जाऊन शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. डोंगराला भेग पडल्यानंतर त्याठिकाणी वनविभाग, महसूल विभाग, जिल्हा परिषद विभाग आणि पोलीस विभागाच्या प्रतिनिधींनी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली आहे. यावेळी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी राम मांढरे, तलाठी शशिकांत कांबळे, वनविभाग अधिकारी मोकल, ग्रामसेवक दिवकर, पोलीस विभागाचे किरवले आणि चिंचोटीमधील ग्रामस्थ उपस्थित होते.

या पाहणीनंतर वनविभागाने डोंगरातीळ जमिनीला गेलेल्या तांड्याचा भौगोलिक अभ्यास करण्याबरोबर भूस्खलन होणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या, अशा सूचना तहसीलदार विक्रम पाटील यांनी दिल्या आहेत. काही ग्रामस्थांनी भविष्यातील आपत्तीचा धोका ओळखून ज्या ठिकाणी डोंगराला भेगा पडल्या आहेत. त्याठिकाणी डोंगराच्या पायथ्याशी संरक्षक भिंत उभारावी, अशी मागणी उपस्थित ग्रामस्थांनी पाहणी करण्यासाठी आलेल्या अधिकारी वर्गाला केली आहे.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक भारती भानुदास पालकर व ज्योती शांताराम भालेकर यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाण .

**मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ९४ | २/अ | १-००-०० | ०-५९ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिदध झालेपासुन ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ता.१५/०७/२०२४ — **समीर हरिश्चंद्र लाड**
मो. ९९२१७२२२०० शॉप नं ० २,साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिवील कोर्टसमोर, कर्जत, कर्जत, रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिथे मालक निलेश सुरेश प्रधान व संजय सिताराम कोळी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिथे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर चौ.मी. | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| ८६ | ८ | ५.४१.०० आर चौ. मी. म्हणजेच ५४१ चौ. मी. | ५४-१० |
| ८६ | ९ | ४.५७.०० आर चौ.मी. म्हणजेच ४५७ चौ.मी. | ४५-७० |

या वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास. वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विधारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १५/०७/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली पुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड
४१०२०१

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

**निवडक**

### पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध झाली असून यामध्ये रंगनाथ साने (अध्यक्ष), गौरव चऱ्हाटे(उपाध्यक्ष), सुनिल खेडकर (सचिव) तर संचालक म्हणून अर्चना नेमाडे, सुजाता जाधव, संतोष जाधव, शिवसजन कान्हेकर, अरूण कांबळे, धनाजी घरत, भास्कर देशमुख, सतिशकुमार पवार यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी सुभाष काळे यांनी जाहीर केले.

### गुणगौरव सोहळा उत्साहात

**माणगाव :** माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप आयोजित समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कुणबी भवन माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्याहस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजी डवले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. समाजातील ६० टक्के पेक्षा अधिक गुण मिळणाऱ्या दहावी व बारावीतील १०० हुन अधिक विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

### ओळखपत्र वाटप कार्यक्रम

**उरण :** दिघोडे रानसई धरणाजवळील रिव्हर व्ह्यू रिसॉर्ट येथे पत्रकार उत्कर्ष समिती या राज्यस्तरीय पत्रकारांच्या संघटनेच्या सदस्य व पदाधिकाऱ्यांचे ओळखपत्र वाटप तसेच वर्षा सहल व स्नेहभोजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी डॉ. अशोक म्हात्रे, डॉ. वैभव पाटील, शैलेश ठाकुर, ज्ञानेश्वर कोळी,अलंकार भोईर, लालचंद यादव, मिलिंद खारपाटील, अक्षय पाटील, अमोल येरणकर, संजय गुप्ता, जितेंद्र तांडेल यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

### उरणकरांना स्वच्छतेचा संदेश

**उरण :** भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीचे मख्यि व्यवस्थापक राजेंद्र टिकेकर यांच्या नेतृत्वाखाली कंपनीतील कामगारांनी स्वच्छ भारत अभियान सप्ताह अंतर्गत कंपनीच्या हेड ऑफिस ते द्रोणागिरी नोड वसाहत-द्रोणागिरी रेल्वे स्टेशन येथे रॅलीचे आयोजन केले होते. यावेळी रॅलीत सहभाग घेतलेल्या अधिकारी व कामगारांनी उरण वासियांना स्वच्छतेच महत्व पटवून देत झाडे लावा पर्यावरण वाचविण्याचे आवाहन केले.

### प्रशांत म्हात्रे यांना पुरस्कार

**चिरनेर :** कडापे येथील उपक्रमशील शिक्षक प्रशांत म्हात्रे यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना रायगड तर्फे सन्मान कर्तृत्वाचा २०२४ पुरस्काराने गौरविण्यात करण्यात आले आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सन्मान कर्तृत्वाचा पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यात कडापे येथील प्रशांत म्हात्रे यांनाही या मानाच्या पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांची ऑनलाईन हजेरी

**सुयोग आंग्रे**
**। रायगड ।**

- **शिक्षकांचे काम पुन्हा वाढणार**
- **'स्विफ्ट चॅट' घेणार आधार**

स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती स्विफ्ट चॅट या ॲप्लीकेशनतधील स्मार्ट उपस्थिती ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षकांना पुन्हा एकदा विद्यार्थी ऑनलाईन उपस्थितीचे काम करावे लागणार आहे. परिणामी शिक्षकांचे काम पुन्हा वाढणार आहे. यामुळे शिक्षक संघटना राज्यभर आक्रमक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अगोदरच विविध अशैक्षणिक कामाने शिक्षक बेजार झाले आहेत. कोणत्याही प्रकारच्या सुविधा न देता ऑनलाईन कामे शिक्षकांकडे सोपवली जात आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांच्या नियंत्रणाखाली विद्या समीक्षा केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील माहिती संकलन व विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ व्हावी. तसेच धोरणकर्ते, शिक्षक आणि सर्व स्तरावरील प्रशासकांसह विविध भागधारकांना माहिती विश्लेषणासाठी एकत्रित व्यासपीठ उपलब्ध व्हावे. तसेच त्याआधारे राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर गरजा लक्षात घेऊन उपक्रम, योजना आखण्यास मदत व्हावी, यासाठी विद्यार्थी उपस्थितीची माहिती आवश्यक आहे.

'स्विफ्ट चॅट' या ॲप्लीकेशनमधील स्मार्ट उपस्थिती ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्याची प्रक्रिया १ डिसेंबर २०२३ पासून सुरू करण्यात आलेली होती. परंतु, जिल्हास्तरावरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत याबाबत नियमित आढावा घेणे, तसेच सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विद्यार्थी उपस्थिती ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यामध्ये अनियमितता दिसून आली आहे. मात्र, सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाइन उपस्थित्ती नोंदविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

राज्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांना स्मार्ट विद्यार्थी उपस्थिती नोंदवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशा सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखाराव यांनी दिल्या आहेत. यासाठी शिक्षकांनी प्ले स्टोअरवरून स्विफ्ट चॅट हे ॲप्लीकेशन डाऊनलोड करून घ्यायचे आहे. या चॅटबॉटवर दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी सकाळी ७ ते दु. १२ तर अन्य शाळांसाठी सकाळी १० ते सायं. ५ या कालावधीत उपस्थितीची नोंद करायची आहे.



**शिक्षक वैतागले**

**शिक्षक सतत काही ना काही कामानिमित्ताने ऑनलाईन ठेवले जात आहेत. विविध माहितीसाठी विविध संकेतस्थळ निर्माण करण्यात आले आहेत. त्या प्रत्येक संकेतस्थळावर विद्यार्थी, शाळा, शिक्षक यांची माहिती सविस्तरपणे नोंदवली जात आहे. शालेय पोषण आहारची माहिती दैनंदिन ऑनलाईन करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती फॉर्म, शिक्षकांचे वेतन, विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र, द्वितीय सत्र, पायाभूत चाचणी शासनाच्यावतीने घेण्यात येत असलेल्या विषयांचे गुण देखील ऑनलाईन नोंदवण्यात येत आहेत. अनेक कामे ऑनलाईन केली जात आहेत. त्यातच विद्यार्थी रोजची उपस्थिती या कामाची नव्याने भर पडणार आहे. त्यामुळे शिक्षक वैतागून गेले असल्याच्या तक्रारी होत आहेत.**

# 'आंबोली'ला जाणाऱ्या पर्यटकांची पावले अडखळली



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या आंबोली डॅमवर जाणाऱ्या पर्यटकांची पावले अडखळली आहेत. याचे कारण लोणावला भुशी डॅम परिसरात घडलेल्या दुर्घटनेनंतर प्रशासनाने पावसाळी पर्यटन स्थळांवर बंदी घातली आहे. त्यामुळे रविवारी वीकेंडसाठी येणाऱ्या पर्यटकांची पावले अडखळली आहेत. या आंबोली डॅमवर सुट्टीच्या दिवशी शुकशुकाट पाहावयास मिळाले आहे.

मुरूड पासून नाजिकच म्हणजे अवघे ५ कि.मी. अंतरावर खार आंबोली गाव आहे. या गावात आंबोली धरण आहे. या धरणाच्या ओव्हरफ्लो मार्गातच प्रशस्त असा जलतरण तलाव बांधलेला आहे.याची खोली ५ फुट आहे. एकावेळी हजारो पर्यटक पोहण्याचा आनंद घेऊ शकतात. त्यामुळे पावसाळ्यात मुरूडला येणाऱ्या पर्यटकांसाठी पर्यटनासाठी एक पर्वणीच ठरली आहे.

जिल्ह्यात पावसाळी पर्यटन क्षेत्रात पर्यटकांच्या होणाऱ्या दुर्घटनेमुळे पर्यटकांच्या सुरक्षतेसाठी प्रशासन अशा पावसाळी पर्यटन क्षेत्रांवर बंदी घालत असते.हवामान खात्याने दिलेला अतिवृष्टीचा इशारा,गेल्या काही दिवसांपासून जोरदार पडत असलेल्या पावसामुळे रविवारी पर्यटकांची आंबोली धरणाकडे पावले अडखळल्याचे चित्र दिसून येत होते.

## धबधब्यांनी नटलेला 'ताम्हिणी'



● रायगडमधून पुण्याला जाताना ताम्हाणी घाटात पाऊस झाल्याने रस्त्यावरील अनेक धबधबे प्रवाहित झालेत पर्यटकांची चंगळ आहे. रस्ते चांगले झाल्याने पर्यटक संख्या वाढली आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# वाहतूक कोंडीच्या चक्रात 'माथेरान'

**। माथेरान । मुकुंद रांजणे ।**

पावसाळ्यात निसर्गाच्या सानिध्यात एक दोन दिवस थकवा दूर करण्यासाठी जवळचे पर्यटनस्थळ म्हणून माथेरानला पसंती देतात. परंतु येथील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने घाटरस्त्यात वाहतूक कोंडी होत असल्याने तासनतास पर्यटकांना मोटार गाडीतच अडकून राहावे लागत आहे.त्यातच पावसाळ्यात हा केवळ सात किलोमीटरचा वीस मिनिटांचा प्रवास वाहतूक कोंडीमुळे वेळप्रसंगी तीन ते चार तासाचा बनला आहे. त्यामुळे या मार्गावर प्रशासन या वाहतूक कोंडीचे दुष्टचक्र केव्हा दूर करणार या विवंचनेत पर्यटक दिसत आहेत.



निसर्ग सौंदर्याने नटलेल्या माथेरान मध्ये सद्यस्थितीत दस्तुरी नाक्यापासून ते माथेरान रेल्वे स्टेशनपर्यंत ई-रिक्षाची महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध झाल्यामुळे खऱ्या अर्थाने पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसत आहे हे नाकारताच येत नाही.

> **आम्ही आजवर अनेक ठिकाणी पाहिले आहेत की पर्यटनस्थळावर जाण्यासाठी अन्य पर्यायी व्यवस्था असते परंतु माथेरानमध्ये येण्यासाठी नेरळ ते माथेरान हाच मार्ग असल्याने या घाटात सुट्ट्यांच्या हंगामात खूपच गर्दी होते. सुट्टीच्या एकाच दिवशी मुंबईचे लोक फिरायला निघतात. पण सर्वानाच इथे होणाऱ्या ट्रॅफिक मुळे जिकरीचे बनले आहे. सरकारने इथे सुध्दा काहीतरी पर्यायी व्यवस्था केली पाहिजे.**
> **– कौशल्य त्रिपाठी, पर्यटक मुंबई**


अनेक वर्षांपासून दस्तुरी पार्किंग येथील एमपी ९३ हा प्लॉट रिक्त असून तो अद्यापही नगरपरिषदेच्या अखत्यारीत आलेला नाही. हा प्लॉट उपलब्ध होण्यासाठी खऱ्या अर्थाने तालुक्यातील, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करून पार्किंगसाठी उपलब्ध करून दिल्यास पार्किंगची समस्या कायम स्वरूपी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे घाटरस्त्यातील वाहतूक कोंडी आपसूकच दूर होणार आहे. याकामी स्थानिक पातळीवरील आणि तालुक्यातील राजकीय श्रेयवाद बाजूला सारून एकोप्याने हा प्रश्न मार्गी लागू शकतो असे स्थानिक बोलत आहेत.

# सिध्देश्वरीत शिरले नदीचे पाणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

कराडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या बेलंतरा सोसायटीच्या समोरील जवळपास २५ झोपड्यांमध्ये तसेच सिद्धेश्वरी कॉर्नरजवळ असलेल्या उज्वल लॉज परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने तेथील रहिवाशी व उज्वल लॉजचे नुकसान झाले आहे.

यावेळी या दोघांनी पनवेलचे तहसिलदार, तलाठी, पाताळगंगा एमआयडीसीचे अधिकारी, कराडे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना मोबाईलद्वारे संपर्क साधून सदर समस्येबाबत माहिती दिली. सदर समस्येचे गांभीर्य जाणून उपअभियंता किशोर राऊत, राठोड, निवृत्ती आंधळे ताबडतोब घटनास्थळी आले. यावेळी दशरथ गायकर आणि किरण माळी यांनी ठिकठिकाणी



साठलेले पाणी दाखवले. बांधकाम व्यावसायिकांनी नैसर्गिक नाले कशा प्रकारे बुजवले हे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी एमआयडीसीचे अधिकारी किशोर राऊत यांनी एक-दोन दिवसात पाणी जाण्यासाठी वाट करून दिली जाईल व यापुढे पाणी तुंबून कोणाचे नुकसान होणार नाही असे आश्वासन दिले. यावेळी एमआयडीसीने सदर नाले पावसाळ्यापूर्वी साफ न केल्याने हि परिस्थिती ओढवल्याचे काही नागरिकांनी बोलताना सांगितले.

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात नामवंत बिल्डरांनी जागा घेऊन टोलेजंग इमारती उभ्या केल्यात यातच काही बिल्डरांनी मनमानी कारभार केल्याचे दिसून येत आहे. बिल्डरांनी आपल्या टोलेजंग इमारती उभ्या करून यापूर्वी असलेल्या नैसर्गिक पाण्याचा नाला बुजून टाकल्याने नैसर्गिक पाणी जाण्याचा मार्ग बंद झाल्याने येथील आजूबाजूच्या परिसरातील सामान्य नागरिकांना प्रचंड मनस्ताप भोगावा लागत आहे.

# पावसाचे तालुक्यात धुमशान; राब पाण्याखाली

**। पातळगंगा । प्रतिनिधी ।**

गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या पावसांने धुमाकूळ घातल्या मुळे सर्वत्र ठिकाणी पाणीचं पाणी पाहावयास मिळत आहे. पावसामुळे राब उत्तम झाले होते. मात्र तेच राब आता पाण्याखाली गेल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. दिवसभरातून पावसाच्या सरी मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे जलमय परिस्थिती निर्माण झाली आहे.

तालुक्याच्या असलेल्या छोटे ओव्हाळ तसेच पाताळगंगा पूल पाण्याखाली गेलेले पाहावयास मिळत आहे. प्रदीर्घ विश्रांतीनंतर तालुक्यात सक्रिय झालेला पाऊस सलग बरसत असल्यामुळे पावसाचे अक्षरश: धुमशान सुरू असून, क्षणंभर विश्रांती नंतर पाऊस पुन्हा सक्रिय होत आहे. तालुक्यासह जिल्हात पावसाच्या कोसळधार सुरू सुरुच आहे.यामुळे नोकरदारांची कामावर जाताना तारांबळ उडत आहे.

धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.या पावसामुळे तालुक्यातील बळीराजा सुखावला असलातरी शेतातील राब पाण्याखाली गेल्यामुळे चिंताग्रस्त झाला आहे. एकीकडे लावणीचे दिवस निघून जात आहे आणि दुसरीकडे भात रोपे पाण्याखाली जाऊन खराब होत आहे. यामुळे चिंता अधिक वाढली आहे.

# कोलाडमध्ये मुसळधार पाऊस

## आंबेवाडी हद्दीतील रेशनिंग दुकानासह घरात शिरले पाणी



**। कोलाड । वार्ताहर ।**

शनिवारी सकाळपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे आंबेवाडी हद्दीत रात्री अडिच वाजण्याच्या सुमारास कालवा उलटून रेशनिंग दुकानदार बिपिन रमेश गांधी तसेच जवळच्या पाच सहा घरात पाणी शिरल्याने रेशनिंग दुकानातील तांदूळ व गव्हाच्या पोती भिजून नुकसान झाले आहे.

रायगड जिल्ह्यात गेली दोन दिवस मुसळधार पाऊस पडत आहे.त्या पावसाचा फटका सर्वत्र बसत असुन जनजीवन विस्कळीत झाले आहे.

शनिवारी कोलाड हद्दीत पाऊस जास्त झाल्याने नदी, नाले तुडुंब भरले आहेत. आंबेवाडी हद्दीत शनिवारी रात्री कालवा उलटल्याने आंबेवाडी समर्थनगर हद्दीत पाणी शिरले. यात जवळच्या पाच-सहा घरांसह रेशनिंग दुकानदार बिपिन गांधी यांच्या दुकानात पाणी शिरले. त्यानी वितरणासाठी आणलेले तांदूळ व गव्हाची ५० ते ६० पोती भिजली आहेत. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच कोलाड तलाठी नंदकुमार हिंदोळे, आंबेवाडी सरपंच सुरेश महाबले, ग्रामसेवक, उपसरपंच कुमार लोखंडे, कोतवाल बाईत यांनी पाहणी केली.

**प्रवासी आणि एसटी प्रशासनात होणार संवाद**

# 'एसटीच्या आगारांमध्ये प्रवासी राजा दिन'

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव आणि शिमग्याच्या सणाला कोकणात जाण्यासाठी एसटीला सुगीचे दिवस असतात; मात्र याच एसटी महामंडळाच्या आगारांना विविध समस्या व असुविधेने ग्रासलेले आहे. त्याचा परिणाम एसटीच्या उत्पादनावर देखील होतो. त्यामुळे याची दाखल घेत प्रवाशांना योग्य सोई-सुविधा, सुलभ व सुरक्षित प्रवास करता यावा, यासाठी प्रवासी आणि एसटी प्रशासनात संवाद निर्माण व्हावा, यासाठी प्रवासी राजा दिन उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत प्रवासी आणि कामगारांच्या समस्या जाणून घेत त्या सोडवण्यात येणार आहेत. याची सुरुवात १५ जुलै रोजी पेण आगारापासून करण्यात येणार आहे.

एसटी फेऱ्यांमधील विलंबापासून ते एसटी आगारातील विविध समस्या प्रवाशांना भेडसावत असतात. त्याच अनुषंगाने प्रवासी आणि एसटी मंडळातील सुसंवाद वाढवण्यासाठी एसटी महामंडळाने प्रवासी राजा दिन उपक्रम १५ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात स्वत: विभाग नियंत्रक जिल्ह्यातील प्रत्येक आगाराला भेट देणार असून प्रवाशांच्या समस्या जाणून घेणार आहे. ज्या समस्या तत्काळ सोडवता येणाऱ्या आहेत, त्यावर लगेच अंमलबजावणी केली जाणार आहे.

अभियानाची प्रवाशांना माहिती व्हावी, यासाठी प्रत्येक आगारात फलक लावण्यात आले आहेत. तसेच, ध्वनी विस्तारकामार्फत प्रवाशांना अभियानाची माहिती दिली जात आहे. या अभियानात प्रवाशांनाएसटीबाबतभेडसावणाऱ्या कोणत्याही समस्यांच्या तक्रारी करता येणार आहेत. तसेच, प्रवाशांना एसटी मंडळाला सुविधांबाबत काही सूचना द्यायच्या असतील तर त्यादेखील देता येणार आहेत.

## कामगार-पालक दिन

**एसटी महामंडळाच्या प्रवाशांसह एसटी प्रशासनात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी १५ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीत कामगार-पालक दिन हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील एसटीच्या आठ आगारांमध्ये दुपारी तीन वाजता कामगार पालक दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी आगारात काम करताना येणाऱ्या अडचणी, समस्या व कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणेदेखील या कालावधीत ऐकून घेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.**



- **प्रवासी आणि कामगारांच्या समस्या सुटणार**

**प्रवासी राजा दिनाचे वेळापत्रक**

- पेण १५ जुलै
- मुरूड १९ जुलै
- रोहा २२ जुलै
- महाड २६ जुलै
- अलिबाग २९ जुलै
- श्रीवर्धन २ ऑगस्ट
- कर्जत ५ ऑगस्ट
- माणगाव ९ ऑगस्ट

**कर्जत महावितरणवर जन आक्रोश मोर्चा**

# 'नो सर्विस, नो बिल'



**। नेरळ । वार्ताहर ।**

गेल्या अनेक महिन्यांपासून कर्जत महावितरण कार्यालयाच्या भोंगळ कारभारामुळे कर्जतचे नागरिक चांगलेच त्रस्त झाले आहेत.

कर्जतचे ज्येष्ठ वकील कैलास मोरे यांनी याविषयी प्रथम आवाज उठवला त्यांच्या या आवाजाला कर्जत मधील नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.'नो सर्विस नो बिल' हे स्लोगन तर कर्जाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर चांगलेच गाजले. या जनजागृतीमुळे शनी मंदिरामध्ये आंदोलनाची दिशा दाखवण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कर्जतमधील नागरिकांनी प्रतिसाद दिला या सर्व समस्या मांडल्यानंतर शनिवारी (दि.२०) कर्जत महावितरण कार्यालयात निवेदन देण्यासाठी आक्रोश मोर्चाच्या स्वरूपात जाण्याचे निर्णय झाला आहे.

# एक ओंगळ सोहळा

डेव्हिड ब्लेन नावाचा अमेरिकी जादूगार आहे. तो सुरईतून पाणी पितो आणि नंतर ते पाणी परत सुरईत ओततो त्यावेळी त्यात जिवंत बेडूक असतो. भारतातले रस्त्यावरचे किंवा स्टेजवरचे अनेक जादूगार असे प्रयोग करतात. पण ते इंग्रजी बोलू शकत नाहीत. शिवाय, ते युरोप-अमेरिकेतले नसल्याने वलय नाही. ब्लेन आपल्या एका शोसाठी काही कोटी रुपये घेतो. अनंत मुकेश अंबानी याच्या साखरपुड्यासाठी त्याला मुद्दाम बोलावलेले होते. हा साखरपुडा मार्च महिन्यात जाम नगरमध्ये झाला. अंबानींचा तेलशुद्धीकरण प्रकल्प जामनगरला आहे. तेथे मार्च महिन्यात हा जंगी सोहळा झाला. स्थानिक लोक व कामगारांसाठी जेवणावळी झाल्या. त्यावेळी रिहाना, अकॉन, दलजित दोसांज यांच्यासारख्या गायक कलावंतांचेही कार्यक्रम ठेवण्यात आले. त्यात रिहानाला एका रात्री दोन-तीन गाण्यासाठी सुमारे ७५ कोटी रुपये देण्यात आले. याखेरीज तिला आणि सर्वच पाहुण्यांना खास विमानाने येथे आणण्यात आले व पंचतारांकित सुविधा दिल्या गेल्या. या सोहळ्याला फ सबुकचा मालक मार्क झुकरबर्ग, मायक्रोसॉफ्टचा बिल गेट्स, गुगलचा सुंदर पिचाई असे जगातले सर्वोच्च पदांवरचे लोक हजर होते. अशा या साखरपुड्यासाठीच निव्वळ एक-दीड हजार कोटी रुपये खर्च झाले असे म्हणतात. नंतर इटली ते फ्रान्स या दरम्यान एक खास क्रूझ करण्यात आली. अंबानीच्या लग्नाची वरात ही भारतातल्या कुठल्याही रस्त्यांवरून निघू शकत नाही. त्यासाठी खास क्रूझ वगैरेंचा माहोलच हवा. या क्रूझवर पुन्हा असेच जंगी कार्यक्रम करण्यात आले. त्यासाठी शेकडो कोटी खर्च करण्यात आले. त्यानंतर आता जुलै महिन्यात प्रत्यक्ष लग्न झाले. याला हजर राहण्यासाठी पंतप्रधान मोदी मुंबईत आले. पण त्यांनी तो दौरा मात्र सरकारी दाखवला. जाता जाता बोरीवली-ठाणे वगैरे भूमिगत मार्गांची भूमिपूजने उरकून घेतली. बाकी असेच अनेक मान्यवर आले होते. सॅमसंग कंपनीचे मुख्य, ब्रिटनचे माजी पंतप्रधान इत्यादी. याखेरीज क्रिकेटपटू, बॉलिवूडचे स्टार, भारतातल्या सामान्य जनतेने नावही ऐकलेले नाही पण अमेरिकेत प्रचंड लोकप्रिय असलेले खेळाडू, कलावंत अशांची गर्दी मांडवात झाली होती.

### धंद्याची गणिते

सामान्य लोकांचे लग्न एका दिवसात आणि एका जेवणावळीनंतर संपते. फार तर संध्याकाळी स्वागत समारंभ आयोजिला जातो. अंबानींचे लग्न सामान्यांसारखे कसे होईल? मुख्य लग्नसोहळा शुक्रवार ते रविवार असा तीन दिवस चालला. यात आलेल्या खास पाहुण्यांसाठी पोषाखही अंबानींनीच करून घेतले होते असे म्हणतात. त्यांना प्रचंड महागड्या भेटवस्तू देण्यात आल्या. या बदल्यात या मंडळींनी काय आहेर केला हे कधीही कळणार नाही. अर्थात, कदाचित अंबानींनी पूर्वी वेळोवेळी त्यांना मिळालेल्या आहेरांची ही परतफेड केली असेही म्हणता येईल. आधी रिलायन्स इंडस्ट्रीज आणि नंतर जिओच्या फोनला प्रतिस्पर्ध्यांचा त्रास होऊ नये म्हणून काँग्रेसपासून ते नरेंद्र मोदींपर्यंत सर्वांनी अंबानींवर जी मेहेरनजर केली आहे ती कशी विसरता येईल? ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलियाचे माजी पंतप्रधान किंवा अमेरिकेच्या ट्रम्प यांची मुलगी हे व अंबानी यांच्या आहेरांची देवाणघेवाण आधीच झाली असावी किंवा यानंतर कशी करायची हे ठरलेले असावे. या लग्नाचा एकूण खर्च पाच हजार कोटी रुपये झाला असे म्हणतात. पाच हजार कोटी रुपयांमध्ये आपल्या किती शाळा किंवा इस्पितळे चालतील असा हिशेब अनेक जण करीत आहेत. पण तो व्यर्थ आहे. हे पाच हजार कोटी निव्वळ हवेत उडवलेले नाहीत. याच्यातून काय मिळाले पाहिजे याची गणिते तयार असणार. माझे काम होणार असेल तर मी दरवाज्यावरच्या शिपायालासुध्दा सलाम करीन असे धीरुभाई अंबानी म्हणत. ते मुकेश यांचे वडिल व ज्याचे लग्न आता झाले त्या अनंतचे आजोबा. धीरुभाईंनी शून्यातून विश्व उभारले. मात्र तुलनेने त्यांचे पाय जमिनीवर राहिले. आता दुसऱ्या व तिसऱ्या पिढीने सर्व संयम वाऱ्यावर सोडून दिल्यासारखे वाटते. पण यातही धंद्याची गणिते बरोबर साधली जाणार आहेत.

### किडलेला समाज

या सोहळ्याच्या निमित्ताने अंबानी समुहाची प्रतिमा उजळ करण्याचा प्रयत्न झाला. वास्तविक अंबानी व त्यांच्या रिलायन्सवर अनेक आरोप झाले आहेत. त्यांनी महासेझ प्रकल्प राबवून नवी मुंबई व रायगडमधल्या शेतकऱ्यांना निर्वासित करण्याचा प्रयत्न केला. पण स्थानिकांच्या आंदोलनाच्या दणक्याने रिलायन्सला त्यातून माघार घ्यावी लागली. कृष्णा गोदावरी खोऱ्यातील तेल व नैसर्गिक वायू महामंडळ या सरकारी कंपनीच्या मालकीच्या विहिरीशेजारीच वेगळी विहीर खणून त्यांचा वायू चोरल्याचाही रिलायन्सवर ठपका आहे. जिओ बाजारात टिकावी इतर कंपन्यांना नामशेष करण्यात आल्याचा आरोप प्रतिस्पर्धी एअरटेल, टाटा किंवा व्होडाफोन यांच्यासारख्या कंपन्यांनी पूर्वी केला होता. बीएसएनएल ही आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर संपवण्यात आल्याचे आपण पाहत आहोतच. थोडक्यात या लग्नासाठीचा पैसा अशाच सर्व भानगडींच्या व्यापार-धंद्यातून जमा झालेला आहे. जनतेने ते सर्व विसरून जावे आणि रिलायन्स व अंबांनींची छबी उजळून निघावे अशा हेतूनेच बहुदा मुलाच्या लग्नाचा हा घाट घालण्यात आला. अंबानींकडे सध्या बारा हजार कोटी म्हणजे सुमारे साडेआठ लाख कोटी रुपयांची संपत्ती आहे. यातून दर मिनिटाला अंबानी किती कोटी रुपये कमावतात याचे आकडे प्रसिध्द होत असतात. म्हणजेच हा अग्रलेख वाचून होईपर्यंत तिकडे अंबानींच्या खिशात सुमारे दहा कोटी रुपये जमा झालेले असतात. या लग्नाच्या खर्चावरच्या आक्षेपांना उत्तर देताना हे अंबानींनी कष्टाने कमावलेले पैसे आहेत असा युक्तिवाद केला जातो. तो हास्यास्पद आहे. सरकारने त्यांच्यावर केलेल्या मेहरबानीचा आणि प्रतिस्पर्ध्यांना नष्ट करण्याच्या धोरणांचा अंबानी श्रीमंत होण्यात मोठा वाटा आहे. हा आमचा पैसा आहे, आम्ही कसाही उडवू असे सांगण्याचा निर्लज्जपणा हे सध्याच्या युगाचे खास वैशिष्ट्य आहे. आपल्या आसपासचा दुष्काळ, गरिबी, उपासमार यांच्याकडे दुर्लक्ष करून चाललेले श्रीमंतीचे हे ओंगळवाणे प्रदर्शन म्हणजे समाज किती किडलेला आहे त्याचा पुरावा आहे.

विचार

# पैसे वाचताहेत, खर्च वाढतोय...

***पैसे खर्च करण्याच्या आणि वाचवण्याच्या जनसामान्यांच्या वृत्तीवर प्रकाश टाकणाऱ्या काही बातम्या अलिकडे समोर आल्या. भारतीयांच्या असुरक्षित कर्जात वाढ होत असल्याचा एक निष्कर्ष रिझर्व्ह बँकेच्या पाहणीमध्ये समोर आला. दुसरीकडे, कॅशलेस पेमेंटमुळे नागरिकांच्या खर्चात वाढ होत असल्याचे निरिक्षण नोंदवले गेले. दरम्यान, जीएसटीने लोकांच्या खिशाचा भार हलका केल्याचा दावा करण्यात आला.***




**महेश देशपांडे**

जनसामान्यांच्या पैसे खर्च करण्याच्या आणि वाचवण्याच्या वृत्तीवर प्रकाश टाकणाऱ्या काही बातम्या सरत्या आठवड्यामध्ये समोर आल्या. त्या अर्थविश्वाचे चित्र विषद करणाऱ्याही ठरल्या. भारतीयांच्या असुरक्षित कर्जात वाढ होत असल्याचा एक निष्कर्ष रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केला. दुसरीकडे कॅशलेस पेमेंटमुळे नागरिकांच्या खर्चात वाढ होत असल्याचे निरिक्षण नोंदवले गेले. दरम्यान, जीएसटीने लोकांच्या खिशाचा भार हलका केल्याचा दावा करण्यात आला.

अलिकडच्या काळात लोकांचा क्रेडिट कार्डवरील खर्च वाढला आहे. त्याचबरोबर गोल्ड लोनचा खर्च क्रेडिट कार्डच्या खर्चापेक्षा वाढला आहे. बँकांच्या थकीत कर्जांबाबत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आकडेवारीमध्ये ही माहिती समोर आली आहे. असुरक्षित कर्जात होत असलेल्या वाढीबद्दल रिझर्व्ह बँकेने चिंता व्यक्त केली आहे. रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या माहितीनुसार, क्रेडिट कार्डची थकबाकी वार्षिक आधारावर २६.२ टक्क्यांनी वाढली आहे तर सोने कर्जे वार्षिक आधारावर २९.७ टक्क्यांनी वाढली आहेत. एकूण बँक क्रेडिटमध्ये झालेल्या १९.८ टक्के वाढीपेक्षा हे खूप जास्त आहे. हे आकडे मे २०२४ पर्यंतचे आहेत. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार मे २०२४ पर्यंत बँकांची एकूण पत १६७.४ लाख कोटी रुपये झाली आहे. सर्वाधिक २७.९ लाख कोटी रुपयांचे योगदान गृहकर्जाचे आहे. गेल्या वर्षभरात गृहकर्जाची आकडेवारी ३९ टक्क्यांनी वाढली आहे. दुसरीकडे, याच कालावधीमध्ये क्रेडिट कार्डची थकबाकी जवळपास २६ टक्क्यांनी वाढून २.७ लाख कोटी रुपये झाली असून सोने कर्ज जवळपास तीस टक्क्यांनी वाढून १.२ लाख कोटी रुपये झाले आहे.

या कालावधीत बँकांनी बिगर बँकिंग क्षेत्राला दिलेल्या कर्जाची संख्या १६ टक्क्यांनी वाढून १५.७ लाख कोटी रुपये झाली आहे. असुरक्षित कर्जाच्या वाढीमुळे रिझर्व्ह बँक चिंतेत आहे. रिझर्व्ह बँकेने क्रेडिट कार्डसारख्या असुरक्षित कर्जांच्या झपाट्याने वाढीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. गृहकर्ज, सुवर्ण कर्ज, कार कर्ज सुरक्षित कर्जांच्या श्रेणीत येतात. त्याच वेळी वैयक्तिक कर्ज आणि क्रेडिट कार्डची थकबाकी इत्यादींना असुरक्षित कर्ज म्हणतात, कारण अशा प्रकरणांमध्ये कर्ज चुकल्यास बँकांकडे वसुलीचा पर्याय नसतो. क्रेडिट कार्डच्या थकबाकीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याच्या आकडेवारीवरून दिसून येते की आता लोक पूर्वीपेक्षा जास्त क्रेडिट कार्ड वापरत आहेत. क्रेडिट कार्ड वापरणाऱ्यांची संख्याही सातत्याने वाढत आहे. सोन्याच्या किमतीत नुकतीच झालेली वाढ ही सोन्याची कर्जे वाढण्यास जबाबदार धरली जात आहे. किमतीत वाढ झाल्यामुळे बँका आता पूर्वीपेक्षा तेवढ्याच रकमेवर अधिक कर्ज देऊ करत आहेत.

याच सुमारास बदलत्या काळानुसार भारतासह जगभरात कॅशलेस पेमेंटचा वापर वाढल्याची मात्र यामुळे जास्त खर्च होत असल्याची माहिती समोर आली. आजकाल लोक रोख वापरण्याऐवजी क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, यूपीआय इत्यादीद्वारे अधिकाधिक पेमेंट करण्यास प्राधान्य देत आहेत. रोख रकमेऐवजी कॅशलेस पेमेंटचे माध्यम निवडत असल्याने लोकांच्या खर्चात वाढ होत आहे. मेलबर्न युनिव्हर्सिटी आणि ॲडलेड युनिव्हर्सिटीने जगभरात होत असलेल्या कॅशलेस व्यवहारांबाबत अहवाल तयार केला आहे. या अहवालासाठी १७ देशांमधील एकूण ७१ पेपर्सचा अभ्यास करण्यात आला असून लोकांच्या खर्चाच्या पद्धती तपासण्यात आल्या आहेत. या अहवालावरून समोर आले आहे, की पूर्वी लोक हिशेब डायरीत लिहून ठेवत असत. आजकाल डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या ट्रेंडमुळे लेखी खात्यांकडे कल कमी झाला आहे. या अहवालामध्ये लोकांना पैसे वाचवण्यासाठी कार्डऐवजी रोख रक्कम ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

क्रेडिट किंवा डेबिट कार्डांऐवजी रोखीने पैसे अदा केल्यास लोक खर्चाचा अधिक चांगला मागोवा ठेवू शकतील. त्यामुळे पैशांची बचत होण्यास मदत होते. गेल्या काही वर्षांमध्ये लोकांचा चैनीच्या वस्तूंवरचा खर्च वाढल्याचेही या अहवालातून समोर आले आहे. आजकाल लोक चैनीच्या वस्तूंवर खर्च करणे हे 'स्टेटस सिम्बॉल' म्हणून पाहतात. त्याच वेळी, लोक अजूनही देणगी आणि टिप्स देण्यासाठी जुनी पद्धत अवलंबत आहेत. यासोबतच लोकांना आता कॅशलेस व्यवहाराची सवय झाल्याचेही या अभ्यासातून समोर आले आहे. कॅशलेस व्यवहारांमुळे लोकांच्या पैसे खर्च करण्याच्या सवयी कशा बदलल्या आहेत हे समजावून देणे हा या संपूर्ण अभ्यासाचा उद्देश आहे. लोक पूर्वीपेक्षा जास्त विचार न करता पैसे खर्च करत असल्याने हा अहवाल समजून घेणे महत्वाचे आहे.

आता एक बातमी जीएसटीने लोकांच्या खिशावरचा भार हलका केल्यासंदर्भातली. स्मार्टफोन किंवा तुमच्या घरासाठी स्मार्ट टीव्ही, फ्रिज, एसी यासह इतर गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. सर्वसामान्यांना महागाईपासून दिलासा देण्यासाठी सरकारने शानदार योजना आखली आहे. आता लोकांना टीव्ही, रेफ्रिजरेटर, मोबाईल फोन घेण्यासाठी जास्त पैसे खर्च करण्याची गरज नाही. अर्थ मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार जीएसटी कौन्सिलने घरगुती उत्पादने आणि मोबाईल फोनवरील कर दर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे लोकांना मोबाईल, टीव्ही, फ्रिज खरेदी करताना महागाईपासून दिलासा मिळणार आहे. नवीन अप्रत्यक्ष कर प्रणाली म्हणून जीएसटीला अलिकडेच सात वर्षे पूर्ण झाली. जीएसटीमध्ये सुमारे १७ स्थानिक कर आणि उपकर समाविष्ट करण्यात आले होते. सातव्या जीएसटी दिवसाची थीम 'मजबूत व्यापार, सर्वांगीण विकास' अशी आहे. मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दिलेल्या माहितीनुसार एप्रिल २०१८ पर्यंत जीएसटी करदात्यांची संख्या एक लाख पाच हजार कोटी रुपये होती. ती एप्रिल २०२४ मध्ये वाढून एक लाख ४६ हजार कोटी झाली आहे.

केंद्रीय अप्रत्यक्ष कर सीमा शुल्क मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार अग्रवाल यांनी सांगितले की आम्ही चांगल्या अनुपालनासह करदात्यांच्या बेसमध्ये मोठी उडी पाहिली आहे. घरगुती वस्तूंवरील जीएसटीपूर्वीच्या आणि नंतरच्या कर दरांचा तुलनात्मक तक्ता देताना मंत्रालयाने म्हटले आहे की या करामुळे जगणे सोपे झाले आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर प्रत्येक घरात अन्नपदार्थ आणि मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर होणारा खर्च कमी झाला आहे. जीएसटी लागू होण्यापूर्वी गहू, तांदूळ, दही आणि लस्सी या खाद्यपदार्थांवर २.५ ते ५.४ टक्के कर लावला जात होता तर जीएसटी लागू झाल्यानंतर हा कर शून्य झाला. कॉस्मेटिक्स, मनगटी घड्याळे, प्लास्टिक स्वच्छता उत्पादने, दरवाजे आणि खिडक्या, फर्निचर आणि गाद्या यासारख्या घरगुती वस्तूंवर जीएसटी प्रणालीमध्ये १८ टक्के दराने कर आकारला जातो तर पूर्वी उत्पादन शुल्क आणि व्हॅट प्रणालीमध्ये तो २८ टक्के कर होता. मंत्रालयाने सांगितले की यापूर्वी मोबाईल फोन, ३२ इंचापर्यंतचे टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, इलेक्ट्रिकल उपकरणे (वातानुकूलित यंत्रे वगळता), गिझर आणि पंखे यांच्यावरील कर ३१.३ टक्के होता. तो जीएसटीच्या काळात १८ टक्के करण्यात आला आहे. लहान करदात्यांच्या अनुपालनाचा बोजाही कमी करण्यात आला आहे. जीएसटी परिषदेने २०२३-२४ या आर्थिक वर्षात दोन कोटी रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल असलेल्या करदात्यांना वार्षिक रिटर्न भरण्याची अट दूर करण्याची शिफारस केली आहे.

आजकाल

# केईएममधील हृदय प्रत्यारोपणाच्या निमित्ताने

**दीपक परब**

लग्नाच्या जवळजवळ सात वर्षांनंतर सई गरोदर होती. खरंतर मुल असायलाच पाहिजे, या बाबतीत मी फारसा आग्रही नव्हतो. जर होत नसेल तर आपण एखादं मुल दत्तक घेऊ,या मताचा मी होतो; परंतु आपल्याकडे महिलांवर वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक दबाव असतात. वांझपणा हीसुद्धा बाईला आपल्यातली उणीव वाटते.

सईचा आग्रह होता की एखादं तरी मुल असावं. मग त्यासाठीचे उपचार सुरू झाले. त्याला सफलताही आली आणि तिला दिवस गेले. सगळं व्यवस्थित सुरू होतं. कल्याणच्या वैष्णवी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. सातव्या महिन्यात असताना तिला अस्वस्थता वाटू लागली, म्हणून दवाखान्यात घेऊन गेलो. तिचा रक्तदाब वाढलेला होता. डॉक्टरांनी उपाययोजना सुरू केल्या, परंतु रक्तदाब कमी होत नव्हता आणि सईची तब्येत बिघडत चालली होती. मग डॉक्टरांनीच सुचवलं की मुंबईला हलवायला हवं. आम्ही केईएमला घेऊन गेलो. केईएम वर तसाही भरपूर भार असतो. खाटा उपलब्ध नसतात. सईसाठी आयसीयूमध्ये जागा हवी होती. ती नव्हती. खूप खटपट करावी लागली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातले मंगेश चिवटे यांच्याशी कायद्याने वागा लोकचळवळीचे संस्थापक राज असरोंडकर यांनी संपर्क केला. शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक अध्यक्ष सुरज चव्हाण यांचीही मदत झाली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहय्यता कक्षातून पाठपुरावा सुरू होता आणि कशी तरी एमआयसीयूमध्ये जागा मिळाली.

सईला वाचवण्यासाठी केईएम मधल्या डॉक्टरांनी प्रयत्नांची शर्थ केली, हे मी डोळ्यांनी पाहिलं आहे. काही महिला डॉक्टर तर ड्युटी संपल्यानंतरही तिच्या काळजीपोटी थांबून राहत होत्या. तिथल्या उपचारांबद्दल आपल्याला कुठलीच तक्रार करता येणार नाही, परंतु कल्याणातून मुंबईत गेल्यावर आम्हाला समजलं की तिला काविळीची बाधाही झालेली होती. ब्रेन हॅमरेज होता. मेंदूत रक्तस्त्राव झालेला होता. पोटामध्ये सात महिन्यांचं बाळ होतं. रक्तदाब उतरत नव्हता. सगळीच गुंतागुंत होती. आधी डिलिव्हरी करावी की मेंदूचं ऑपरेशन करावं, हा निर्णय होत नव्हता.

या सगळ्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत सईला वाचवणं मुश्किल दिसत होतं. त्याच दरम्यान तिथल्या डॉक्टरांनी तिचं हृदय ठीकठाक असल्याचं व ते दान करण्याविषयी सुचवलं.

ज्या व्यक्तीला आपण वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहोत, जंग-जंग पछाडत आहोत, त्या व्यक्तीचा मृत्यू स्वीकारून अवयवदानाच्या निर्णयाप्रत यावं हा खरं तर कठीण प्रसंग होता. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मी पती असलो तरी तिचा मालक नव्हतो. तिची माहेरची मंडळी होती. माझ्याही कुटुंबातलेही सदस्य होते. त्यांचा विचार घेणं गरजेचं होतं. मी सगळ्यात आधी कायद्याने वागा लोकचळवळीचे अध्यक्ष राज असरोंडकर यांच्याशी चर्चा केली. त्यांनी मला सांगितलं की आपली व्यक्ती बरी होऊन आपल्यात परतली तर त्यापेक्षा आनंदाची दुसरी कुठलीच गोष्ट असू शकत नाही, परंतु जर तशी शक्यता नसेल आणि आपण अवयव दानाचा निर्णय घेऊन एका विहित वेळेत डॉक्टर त्याचं प्रत्यारोपण दुसऱ्या रुग्णावर करू शकले तर तीसुद्धा तितकीच आनंदाची गोष्ट असू शकते. मी माझ्या कुटुंबियांशी चर्चा केली आणि हृदयदानाचा निर्णय घेतला.

कायद्याने वागा लोकचळवळीशी गेली सात वर्षे मी जोडलेला आहे. या चळवळीची संविधानिक विचारधारा, कार्यपद्धती आणि राज असरोंडकर यांचे प्रागतिक विचार यांचा प्रभाव माझ्यावर आहे. या चळवळीच्या माध्यमातून मी अनेक प्रश्न तडीस नेले आहेत. अनेक व्यक्तींचे प्रश्नही सोडवलेले आहेत. या पार्श्वभूमीमुळे मला हृदयदानाचा निर्णय घेणं सोपं गेलं.

केईएममधील कोणीतरी एक रुग्ण हृदयदानाच्या प्रतिक्षेत होता, असं मला कळलं. मोठ्या रुग्णालयात जाऊन लाखोंचा खर्च करण्याची परिस्थिती लोकांची नसतेच. सईचं हृदय हे कोण्या गरजू व्यक्तीवर प्रत्यारोपण करण्यात आलेलं आहे, इतकंच मला कळलंय. केईएम रुग्णालयात जवळजवळ शंभर वर्षांनी अशा प्रकारची शस्त्रक्रिया झाली आहे. पुढच्या दहा दिवसात या शस्त्रक्रियेची सफलता झाली की नाही ते निश्चित होईल. ती होईलच, असं माझं मन सांगत आहे. ती झाली तर महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात एका नव्या क्रांतीची सुरुवात व्हायला हरकत नाही. शासकीय रुग्णालयात हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकते आणि शासकीय रुग्णालयातल्या डॉक्टरांकडे ती क्षमता आहे, हे या घटनेने अधोरेखित होणार आहे.

गरज आहे राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची. पैशापाण्याची जराही पर्वा न करता करोडो रुपये जरी खर्च करावे लागले तरी राज्यातल्या नागरिकांच्या जीवाचं रक्षण प्राधान्यावर ठेवून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर अधिकाधिक खर्चाची तरतूद करण्याचं धोरण राज्य सरकारने अंगिकारलं पाहिजे. आम्हाला अत्याधुनिक उपचारांसाठी कल्याणहून मुंबईला जावं लागलं. आमच्या परिसरात, ठाणे जिल्ह्यात केईएम इतकंच ताकदीचं रुग्णालय आम्हाला कधी मिळेल, हा माझा सरकारला सवाल. उल्हासनगरात जिल्हा रुग्णालय आहे. सरकार जिद्दीने त्याचं अत्याधुनिकीकरण का करत नाही, हा प्रश्न मला पडलेला आहे.

लोकसंसद

### शासकीय कार्यक्रमात मराठी भाषेची अवहेलना

गेल्या चार दिवसात महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत दोन शासकीय कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडले. पहिल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य विधान परिषदेच्या शताब्दी निमित्ताने उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी विधानभवनात राज्य विधान मंडळाच्या सदस्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. दुसऱ्या एका शासकीय कार्यक्रमात प्रधानमंत्री (पंतप्रधान!) नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतल्या अनेक पायाभूत प्रकल्पांचे भूमिपूजन आणि विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. मात्र या दोन्ही शासकीय कार्यक्रमाचे निवेदन आणि सूत्र संचालन महाराष्ट्राची राज्यभाषा (राजभाषा) असलेल्या मराठी भाषेऐवजी हिंदीमध्ये करण्यात आले. मुंबईतल्या विविध पायाभूत प्रकल्पांच्या माहितीचे लघुपटही हिंदी भाषेत दाखविण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्राची राज्यभाषा नक्की कोणती? हिंदी की मराठी? असा प्रश्न पडला. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे येथे हिंदी भाषेला विरोध नाही. मराठी भाषेचे शब्दभांडार समृद्ध असूनही शासकीय जाहिरातीतून मराठी शब्दांना डावलून सातत्याने हिंदी शब्दांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ शासकीय जाहिरातींमधून 'मेरी माटी मेरा देश', 'आझादी का अमृत महोत्सव', 'पंतप्रधान' या मराठमोळ्या शब्दाऐवजी 'प्रधानमंत्री' असे शब्द वापरले जातात.

**- प्रदीप मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१५ जुलै**

**१८८९:-** शास्त्रीय परिभाषा तयार करणारे विज्ञानाध्यापक, विज्ञान लेखक सखाराम विनायक आपटे यांचा जन्म. आपट्यांनी 'यामिक प्रदीप' व 'वाहती वीज' हे दोन विज्ञान ग्रंथ लिहिले. त्याचबरोबर त्यांनी विज्ञानविषयक स्पुटलेखन मोठया प्रमाणात केले असून सामान्य माणसाला विज्ञानाचा परिचय सुलभतेने व्हावा या हेतूने मराठी भाषेतून त्यांनी हे लेखन केले. **१८९३:-** लेखक आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तम गणेश नानल यांचा जन्म. वैद्य संमेलन पत्रिकेचे संपादन त्यांनी केले. याखेरीज भावप्रकाशाचे मराठी भाषांतर, विषतंत्र ही पुस्तके त्यांनी लिहिली. **१८९६:-** ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक, लेखक आणि निष्णांत डॉक्टर अण्णा मोरेश्वर कुंटे यांचे निधन. 'वाग्भट' या त्यांच्या ग्रंथावरुन त्यांच्या आयुर्वेदावरील दांडग्या आवाजाची कल्पना येते. 'स्त्रीरोगविज्ञान' या ग्रंथासह 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' या ग्रंथाचे त्यांनी संपादन केले. **१८९९:-** रविकिरण मंडळाच्या आठ कवी सदस्यांपैकी एक दत्तात्रय लक्ष्मण गोखले यांचा जन्म. त्यांच्या 'किरण' या प्रातिनिधिक संग्रहात 'प्रेम कशावर' ही कविता आहे. 'भावगीत' या विषयावर चर्चात्मक निबंध आणि 'उषा', 'शलाका', 'प्रभा' आदींमध्ये त्यांची सुनीते व गोष्टी प्रकाशित आहेत. **१९०४:-** लेखक, कवी, चरित्रकार चांगदेव भवानराव खैरमोडे यांचा जन्म. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने लेखनाला सुरुवात. 'पाटील - प्रताप', 'अमृतपाक' ही दोन सामाजिक खंडकाव्ये. 'शुद्र पूर्वी कोण होते?', 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' घटनेवरील तीन भाषणे अशा भाषांतरीत लेखनासह डॉ. आंबेडकर यांचे बृहद्‌चरित्र हे मौलिक लिखाण. **१९१३:-** लेखक, नाटयअभिनेते वि. वा. जोग यांचा जन्म. ह्यांनी अनेक नाटकांतून स्त्रीभूमिका केल्या. याशिवाय 'नटश्रेष्ठ केशवराव दाते' या ग्रंथासह, 'एका राष्ट्रीयत्वाचे दिव्य', 'तामिळनाडूचे संगमकालिन सुवर्णयुग' हे त्यांचे ऐतिहासिक विषयांवरील ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. **१९१५:-** लेखिका सीता कुलकर्णी तथा के. विनया यांचा जन्म. ह्यांनी 'आर्त हृदयाची तळमळ' तसेच 'ओझरते दर्शन' हे जनार्दन स्वामींच्या चरित्रासह, 'संत गुलाबराव महाराज', 'क्रांतिवीर जयराम बाबा' ह्यांची चरित्रे, 'त्रिदल', 'पहाटल्या', 'गंधलता', 'प्रतिबिंब', 'मधुचंद्रिका', 'साधना', 'प्रद्रिप' ही काव्ये, 'विजयवेल' ही कथा आणि 'ज्ञानकाळी' मधून एका साधूचा परिचय अशी साहित्य संपदा. **१९१८:-** ख्यातनाम शिक्षणतज्ञ आणि या विषयावरील एक सिध्दहस्त लेखिका डॉ. चित्रा नाईक यांचा जन्म. **१९२४:-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी प्रा. चंद्रकांत शंकर पारगांवकर यांचा जन्म. 'प्रकाशयात्री जयप्रकाश', 'समतेच्या दिंडीचे वारकरी', 'साने गुरुजी' इ. पुस्तके त्यांनी लिहिली. **१९२७:-** लेखक, वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा जन्म. **१९२९:-** कवी शिवराम विश्राम देवलकर यांचा जन्म. 'सूर्याला साक्षी ठेवून', 'हॅलो, मी कामगार बोलतोय' हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९३०:-** लेखक सिताराम खंडेराव नाईक यांचा जन्म. 'पौरा' हा कथासंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९३०:-** 'ही घ्या ब्राह्मणेतर तरुणांच्या शंकांची उत्तरे' या वैशिष्ट्यपूर्ण लेखसंग्रहाचे लेखक प्रभाकर अंबादास आचार्य यांचा जन्म. 'वाजवा रे वाजवा', 'दवबिंदू' हे त्यांचे आणखी दोन लेखसंग्रह. **१९३१:-** प्रसिध्द लोकशाहीर, लोककलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरी यांच्या विचारांचे निष्ठावंत पुरस्कर्ते विठ्ठल उमप यांचा जन्म. 'पोवाडा, बहुरुपी, भारुड, भजन, गणगवळण, कवने, लावणी, तुंबडी, बोबडी, धनगर गीते, नंदीबैल, वासुदेव, डोंबारी, पोतराज' असे अस्सल मराठमोळे कलाप्रकार तसेच कव्वाली आणि गझल या लोककलेच्या सर्व प्रकारात त्यांनी मुशाफिरी केली. त्यांच्या साहित्य संपादित 'फु बाई फु' हे आत्मचरित्र, 'अरे संसार संसार', 'खंडोबाचं लगीन', 'जांभूळ आख्यान', 'दार उघड बया दार उघड' या कलाकृती, 'उमाळा' हा गझलसंग्रह इत्यादी पुस्तके प्रसिध्द. **१९३२:-** प्रज्ञावंत लेखक, विचारवंत नरहर अंबादास कुरुंदकर यांचा जन्म. 'जागर', 'शिवरात्र', 'धार आणि काढ' ही त्यांची पुस्तके वाचनीय आहेत. **१९३३:-** कवी वसंत हिरालाल मातुरकर यांचा जन्म. 'इंद्रधन' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९३४ :-** 'तो आणि त्याचा मुलगा' या गाजलेल्या कादंबरीचे लेखक ल. ना. केरकर यांचा जन्म. याशिवाय ह्यांनी '..... आणि अनेक', 'कोंडमारा', 'पांढरा सिंह', 'काळी चौक' या कादंबऱ्या प्रकाशित. **१९३५:-** कवी, कादंबरीकार, नाटककार अनंत कदम यांचा जन्म. 'बासरी' हा काव्यसंग्रह, तसेच 'किडे', 'पाखरु', 'दिवसातल्या अंधारात', 'कॅन्सर' मिळून १४ कादंबऱ्या. कादंबऱ्यांतून वास्तवतेचे भीषण चित्रण. 'धम्मपद' हा त्यांनी पालीतून मराठीत केलेला अनुवाद. **१९३७:-** लेखक दलित पँथरचे एक संस्थापक, सदस्य प्रल्हाद नामदेव चेंदवणकर यांचा जन्म. 'ऑडिट', 'ऑर्डर...ऑर्डर' हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९३८:-** लेखक पेशाने डॉक्टर, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मल्हार पांडुरंग पतंगे यांचा जन्म. ह्यांचे 'आयुर्वेदिय विषतंत्र', 'शरीरस्थान-चरकसंहिता', 'चिकित्सास्थान-सुश्रितसंहिता' हे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. **१९३९:-** शैक्षणिक व सामाजिक विषयांवर लेखन करणारे लेखक प्राचार्य महेंद्र धोंडू यांचा जन्म. 'ज्वलंत ग्रामीण शैक्षणिक समस्या' हा ग्रंथ त्यांनी साकारला आहे. **१९४०:-** इतिहासाचे अभ्यासक लेखक बाबाजी विष्णू राणे यांचा जन्म. 'छत्रीय कुलवंतास आमी शहाण्णव कुळी मराठे' ह्या ग्रंथातून त्यांनी पेशवाईपर्यंतच्या मराठयांच्या पराक्रमाचा इतिहास कथन केला आहे. **१९४१:-** कथा-कादंबरीकार माधव कोंडविलकर यांचा जन्म. अस्पृश्यता आणि दारिद्र्याचे चटके त्यांनी 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आपल्या आत्मचरित्रातून मांडले.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ जुलै

१) श्री. रवींद्र नारायण गावकर
पंतनगर, अलिबाग, १५-७-१९४१
२) श्री. सुधाकर अनंत पतंगे
चेंढरे, अलिबाग, १५-७-१९४७
३) श्री. नल्लुरी कोटीबसवय्या लिंगाप्पा
पंतनगर, अलिबाग, १५-७-१९३८
४) श्री. विनायक शांताराम शिंपी
चेंढरे, अलिबाग, १५-७-१९४८
५) श्री. विनोद नारायण भाटकर
आक्षी, अलिबाग, १५-७-१९४६
६) श्री. दिनकर महादेव पाटील
चेंढरे, अलिबाग, १५-७-१९३७
७) श्री. महादेव गोविंद साखळकर
सासवणे, अलिबाग, १५-७-१९३९
८) श्री. विलास विनायक पाटील
वेश्वी, अलिबाग, १५-७-१९५५
९) श्री. केशव अर्जुन शेळके
वेश्वी, अलिबाग, १५-७-१९३८
१०) श्री. सुरेश शिवराम म्हात्रे
धोकवडे, अलिबाग, १५-७-१९४२
११) श्रीम. कुंदा रघुनाथ घाग
अलिबाग, १५-७-१९५१
१२) श्री. सुभाष शिवराम म्हात्रे
थळ, अलिबाग, १५-७-१९५७
१३) श्रीम. सीमादेवी संभाजी कसबे
वरसोली, १५-७-१९६२

# तालुक्यातील उल्हास नदीला महापूर

## वावे, बेंबसे, बार्डी गावांचा संपर्क तुटला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीला आलेल्या पुरामुळे तालुक्यातील वावे, बेंडसे आणि बार्डी गावाला पुराच्या पाण्याने घेराव घातला आहे. तर, त्या तिन्ही गावातील अनेक ग्रामस्थांच्या घरात पुराचे पाणी शिरल्याने स्थानिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

खंडाळा घाटात उगम पावणाऱ्या उल्हास नदीला शनिवारपासून सुरु असलेल्या पावसामुळे महापूर आला आहे. या पाण्यामुळे उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या गावांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. रात्रीच्या वेळी उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या बेंडसे, वावे आणि बार्डी गावाच्या सभोवताली पावसामुळे आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाल आहे. अचानक पावसाच्या पाण्याने या तिन्ही गावांना वेढा घातल्याने तिन्ही गावांचा संपर्क तुटला आहे. वावे गावाच्या





बाहेर असलेली जिल्हा परिषद शाळा इमारत तर तब्बल अर्धी पाण्याखाली बुडाली होती. त्याचवेळी तेथील नळपाणी योजनेचे उद्भव विहीर देखील पाण्याखाली गेली असून पलीकडे असलेल्या बेडसे गावातील अनेक घरांमध्ये महापुराची पाणी गेले आहे.

तालुक्यातील या तिन्ही गावातील ग्रामस्थ रात्रभर जागे होते आणि त्यात रविवारी सकाळी पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यानंतर या गावांचा संपर्क तुटल्याने नातेवाईकांना देखील एकमेकांची मदत करता आली नाही. तसेच, उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या रिसॉर्ट्समध्ये पाणी शिरल्यान येथे असलेल्या पर्यटकांना अन्यत्र हलविण्याची वेळ आली होती. शनिवारपासून सुरु असलेल्या पावसामुळे उल्हास नादीच्या पाण्याची पातळी ४५ मीटरहुन अधिक गेल्याने तीने धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यामुळे अनेक गावांना सतर्क राहण्याचे इशारे महसूल विभागाकडून तसेच तहसील कार्यालयातून देण्यात येत होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस यंत्रणा देखील जागोजागी तैनात होती.

## रामदास शेवाळे यांची फेरनिवड

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारातील बिमा व्यापारी संकुलाची निवडणूक नुकतीच पार पडली होती. बिमा कॉम्पलेक्स मधील मिटिंग हॉलमध्ये नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी मीटिंगचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवडून आलेल्या संचालक मंडळाने सर्वानुमते रामदास शेवाळे यांची तिसऱ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध फेरनिवड केली आहे. गेली १७ वर्ष बिमा व्यापारी संकुलाची सेवा करत असून या वेळी सहकार्यांना संधी मिळावी म्हणून शेवाळे यांनी यावेळी पद न भूषवण्याची भूमिका घेतली होती. परंतु, सोसायटीचे सभासद व संचालक मंडळाच्या आग्रहामुळे त्यांनी हे पद स्विकारत असल्याचे सांगितले. दरम्यान, सोसायटीच्या सचिवपदी वाहतूक व्यावसायिक पुण्यवंत खटकळे तर खजिनदारपदी नारायण फडतरे यांची एकमताने निवड करण्यात आली. किशोरीलाल शर्मा व नारायण आमृले यांना उपाध्यक्ष पद देण्यात आले. आबासाहेब लकडे यांच्यावर सह खजिनदार व नवनाथ वनवे यांच्यावर सह सेक्रेटरीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



## तरूणांनी बुझविला महाकाय खड्डा

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात पडत असलेल्या पावसामुळे उडदवणे येथील रस्त्यावर महाकाय खड्डा पडला होता. येथील तरूणांनी प्रसंगावधान राखून तो खड्डा बुझविला आहे. शनिवारी सकाळपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. अशातच उडदवणे-पालदाड मार्गावर असलेल्या श्रीयुत माळी यांच्या किराणा दुकानासमोर एकाकी पाणी भरायला सुरूवात झाली होती. अशातच तिथे मोठा खड्डा पडल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. यातच या खड्ड्याची व्याप्तीही वाढू लागल्याने दोन्हीकडे वाहतूक कोंडी होऊ लागली होती. अशा गंभीर परिस्थितीत येथील तरूण मारुती तुपकर, महेश तुपकर, दिनेश कराळे, योगेश शिंदे, नितेश कोल्हटकर, मंगेश भाई, स्वामी कोल्हटकर यांनी पुढाकार घेऊन व मेहनत करून तो महाकाय खड्डा बुझविण्यात आला.



## सोन्याच्या अंगठीची चोरी

**पनवेल :** ५० हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या अंगठीची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. चिंध्रण येथील अर्चना जगताप या घणसोली येथे कामानिमित्त गेल्या होत्या. त्यांनी हातात असलेली सोन्याची अंगठी प्लॅस्टीकच्या डबीमध्ये ठेवून ती डबी बॅगेत ठेवली होती. त्या घरी परत आल्या असता त्यांनी बॅग उघडून पाहिले असता त्यात त्यांना अंगठी मिळून न आल्याने त्यांनी याबाबतची तक्रार पोलीस ठाण्यात दिली आहे.

## आदई सर्कल परिसरात खड्डे

**। पनवेल । वार्ताहर ।**

सुकापुर-नवीन पनवेल मार्गावर आदई सर्कल परिसरात रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यातून मार्ग काढताना वाहनांचा वेग मंदावतो आणि त्यामुळे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.

सुकापुर मार्गे नवीन पनवेलकडे जाताना महापालिकेच्या हद्दीत असणाऱ्या आदई सर्कलजवळ रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या ठिकाणी एका बाजूला सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता बनवला आहे. मात्र, तो रस्ता उंचवट्यावर असून डांबरीकरण असलेला रस्ता खाली आहे. त्यामुळे



वाहनेवर खाली होत आहेत. नेरे धोधाणी, आकुर्ली, हरिग्राम, मोरबे परिसरातून हजारोंच्या संख्येने वाहने पनवेलच्या दिशेने जात असतात. त्यांना या खड्ड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावत असून मोठ्या प्रमाणात चालकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. तसेच, या खड्ड्यांमध्ये वाहने आपटून त्यांचे नुकसान होत असलेल्या तक्रारीत वाढ होत आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेने हे खड्डे बुजवून प्रवाशांची या खड्ड्यातून मुक्तता करावी, अशी मागणी केली जात आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**ईश्वरी अवधूत नाईक, वाढदिवस, साईगुलाब इंटरप्राईजेस, थळ**

## विष्णु म्हात्रे यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा येथील विष्णू मंगळ्या म्हात्रे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ६४ वर्षाचे होते. १९७३ पासून ते मोहोपाडा येथे टेलरिंगचा व्यवसाय करीत होते. विष्णू म्हात्रे यांच्यावर अत्यंत शोकाकूल वातावरणात रिस येथील स्मशानभुमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.२१) गुळसुंदे येथे तर तेरावे गरूवारी (दि.२५) निवासस्थानी होणार आहे.



## लाखो रुपयांचा ऐवज लंपास

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर, सेक्टर-४ मधील रेल विहार सोसायटीतील एच बिल्डींगमध्ये फिरोज पारख कुटुंबासह राहण्यास आहेत. काही दिवसांपूर्वी पारख कुटुंबिय परदेशात गेले आहेत. त्यामुळे त्यांचे घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी १२ जुलै रोजी पहाटे त्यांच्या घराचा कडी-कोयंडा आणि टाळे तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यांनी पारख यांच्या घरातील ८० हजाराची रोख रक्कम तसेच ३ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने असा सुमारे ३ लाख ८० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे.

## पनवेलमध्ये रिक्षाची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

बस स्टॉप जवळ उभी करून ठेवण्यात आलेल्या रिक्षाची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. तुकाराम गाटे यांचे खारघर येथे मंडप बांधण्याचे काम सुरू असल्याने त्यांनी त्यांची रिक्षा सेक्टर ५ येथील बस स्टॉपजवळ उभी करून ठेवली होती. यावेळी अज्ञात चोरट्यांनी ही रिक्षा चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार करण्यात आलेली आहे.

## फिरत्या दवाखान्याचे उद्घाटन

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड माध्यमातून ग्रामपंचायत दिघी येथे मोबाइल हेल्थ केअर युनिट उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा गाव पातळीवर आरोग्य सुविधा मिळावी तसेच मोफत औषध सर्वांना मिळण्याकरिता मोफत फिरता दवाखाना उपक्रम अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड आणि हेल्पेज इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आला. यावेळी विपुल गोरिवले, डॉ. संतोष नारायणकर, राजेश्वरी चौधरी, राघवेंद्र राघव, चंदर देव संब्याळ, संदीप कदम, किरण कांदेकर, सलील अंतुले, राजेश कासारे, जयश्री काळे, अवधूत पाटील उपस्थित होते.



## इमारतीच्या स्लॅबसह भिंत कोसळली



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील चिपळे येथील धोकादायक बनलेल्या इमारतीचा स्लॅब आणि भिंत कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या इमारतीत कोणीही राहत नसल्याने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. चिपळे येथील माऊंट व्ह्यू इमारतीतील आठ इमारती धोकादायक बनलेल्या आहेत. ग्रामपंचायतीने त्यांना नोटीस देखील बजावल्या आहेत. सध्याच्या मुसळधार पावसामुळे धोकादायक बनलेल्या या माऊंट व्ह्यू बिल्डिंग नंबर तीन मधील स्लॅब आणि भिंत कोसळली आहे. या इमारतीत कोणीही राहत नसल्याने जीवितहानी टळली आहे. या इमारतीच्या आजूबाजूला काही कुटुंब वास्तव्यास आहेत. या प्रकाराची माहिती शासकीय यंत्रणेला देण्यात आली आहे. येथील इमारतीचा स्लॅब आणि भिंत कोसळल्याची घटना घडल्यामुळे तलाठ्यांनी पंचनामा करून शासनाला कळवावे, अशी मागणी येथील रहिवासी करत आहेत.

## आदईत पर्यटकांची सुरक्षा रामभरोसे?



**। पनवेल । वार्ताहर ।**

पावसाळी पर्यटनासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेले पनवेल तालुक्यातील आदईच्या डोंगरावरचे धबधबे आणि आजूबाजूचा नयनरम्य निसर्ग व परिसर लाखो पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. पाऊस चांगला पडत असल्याने पर्यटकांची पावले आदई डोंगराकडे आपोआपच वळू लागलेली आहेत. रविवार असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक लहान मुलांसह आदईच्या डोंगरावर धबधबाची व पावसाची मज्जा लुटण्यासाठी येत होते. मात्र, येथिल सुरक्षा रामभरोसे दिसत होती. कारण पंधरा दिवसापूर्वी पनवेल तालुक्यातील आदई येथे वर्षा सहलीसाठी आलेल्या ९ तरुणाईंचा जीव खांदेश्वर पोलिसांसह अग्नीशमन दलाच्या जवानांनी वाचविला होता. गेल्याच आठवड्यापूर्वी आदई गावात पूरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. तरी, या परिसरात पर्यटन क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र घोषित करून फलक लावण्यात आलेले नाहीत. यामुळे पनवेल प्रशासनच्या सुरक्षे बाबतच्या घोषणा फक्त कागदावरच दिसत आहेत.

## अधिकाऱ्यांच्या बदल्या

**। पनवेल । वार्ताहर ।**

परिमंडळ १ व परिमंडळ २ अंतर्गत अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या पोलिसी सेवेच्या मुदत संपल्याने त्यांच्या तात्काळ बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये नेरुळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांची पनवेल शहर पोलीस ठाण्यात तर, रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी यांची नेरुळ पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. तसेच, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक माणिक नलावडे यांची वाशी पोलीस ठाणे येथे तर रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांची खारघर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. यातील काही अधिकाऱ्यांनी तात्काळ पदभार स्वीकारला आहे.

# एनएमएमटी सेवा सुरु करण्याची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

अनेक वर्षांपासून उरण तालुक्यात सुरु असलेली एनएमएमटी बससेवा २२ फेब्रुवारीपासून अचानक बंद करण्यात आली आहे. ही बससेवा तात्काळ सुरु करण्याची मागणी उरण तालुक्यातील सोनारी गावचे मंगेश तांडेल यांनी प्रशासनाकडे केली आहे. नवीमुंबई महानगर पालिकेच्या परिवहन



विभागाच्यावतीने उरण ते नवी मुंबई मार्गावर बस सेवा सुरु होती. जुईनगर ते उरण शहरासह तालुक्यातील कोप्रोली, वशेणी व पिरकोन या मार्गांवर चालणाऱ्या ३०, ३१ व ३४ क्रमांक असलेल्या एनएमएमटी बस फेब्रुवारीपासून अचानकपणे बंद करण्यात आल्या आहेत. त्यामुळे उरण तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उरणमध्ये रेल्वे सेवा सुरु झाली आहे. मात्र, रेल्वेच्या फेऱ्या नवी मुंबई साठी एक-एक तासाने आहेत. रेल्वे सेवेच्या नवी मुंबईत जाण्यासाठी व परत येण्यासाठी फेऱ्या कमी असल्यामुळे व वेळेत रेल्वे सेवा नसल्याने रेल्वे सेवेचा प्रवाशांना योग्य तो फायदा होत नाही. त्यामुळे उरण तालुक्यात एनएमएमटी तात्काळ सुरु करण्याची मागणी मंगेश तांडेल यांनी केली आहे.

# पावसाळी हंगामात रानभाज्या बहरल्या

## औषधी गुणांमुळे खवय्यांची पसंती

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

कोंकण म्हटलं तर नवलाई, सौंदर्याने नटलेला स्वर्गच समोर उभा राहतो. हिरवीगार वनराई हे पावसाळ्यातील दृष्ट लागण्याजोगे दृष्य असते. मात्र, या सौंदर्यात अजूनही भर घालतात त्या इथल्या आरोग्यदायक रानभाज्या.

कोकणाला मोठे वनक्षेत्र लाभल्याने येथे विविध प्रकारच्या औषधी वनस्पती आढळून येतात. पुरातन काळापासूनच अनेक रानभाज्या आवडीने खाल्ल्या जात आहेत. पूर्वी पावसाळ्यात इथल्या लोकांचे कसोटीचे दिवस होते. त्यामुळे पावसाळ्यात आदिवासी समाज व इतर गरीब समाज निसर्गाने दिलेल्या भाज्यांवर



आपला उदरनिर्वाह करायचे, आज उदरनिर्वाह करित असे. आदिवासी मंडळींसाठी आज ही या रानभाज्या जगण्याचा मोठा आधार आहेत. आदिवास समाजाला या पावसाळी भाज्यांची चांगली ओळख असते. त्यावर त्यांची घरे चालत असतात.

आजकाल या रानभाज्यांना हल्ली चांगली मागणी येऊ लागल्याने मुरुड शहरासह पंचक्रोशी भागातील आदिवासी महिला रानभाज्या विक्रीसाठी मुरुड बाजारात आणू लागल्या आहेत. यामुळे बाजारपेठ हिरवीगार दिसु लागली आहे. वर्षभर कोबी, वायगी, पडवळ यांसारख्या नेहमीच्या भाज्या खाणारे अनेक जण पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्या खेरदीसाठी तुटुन पडलेले दिसत आहेत. जंगलातील रान भाज्यांमध्ये औषधी गुणधर्म जवळपास सारखेच असल्याने भारंग, पालक, लाल माठ अश्या विविध रानभाज्यांना खवय्यांकडून जास्त पसंती देऊन खरेदी केली जाते.

## मेट्रो मार्ग उभारणीला सुरुवात

**। पनवेल । वार्ताहर ।**

तालुक्यातील तळोजा परिसरातील गावालगत कल्याण-तळोजा मेट्रो रेल्वे मार्ग उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली असून येथे पिलर उभारणीसाठी खोदकाम करण्यात येत आहे. यामुळे तळोजा वसाहतलगत असलेल्या जमिनीच्या किमतीत मागील वर्षीपेक्षा दुप्पटीने वाढ झाली आहे. तसेच, कल्याण-तळोजा मेट्रो मार्गामुळे तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई आणि पनवेल परिसरात व्यवसाय, नोकरी करणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर आणि कमी वेळेत होणार आहे.

## पतसंस्थेतर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**। माणगाव । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्थांपैकी एक माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. उतेखोल संस्थेतर्फे २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदविका उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासद पाल्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी (दि.१३) संस्था कार्यालयात संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष आनंद यादव तसेच संचालक दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, दीप्ती मोरे यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत सोहळा पार पडला.



यावेळी पतसंस्थेतर्फे दहावीचे विद्यार्थी श्रावणी गवळी, नहुष भोनक, दिव्या दिवेकर, सायली मोरे, वेदांत केकाणे, आनम शेख, सादीक यतीनमणी, संस्कार पालकर, ओम पारकर, तन्वी गुगळे, रुची तळकर, अवधूत जाधव, सार्थक भोसले, नीलम गावडे, मधुरा अहिरे, ओमकार उंडरे, सिदरा परदेशी. बारावीचे विद्यार्थी पार्थ शेट, मयूरी मिरजक, प्राची मसुरे, श्रेयश कळस, हर्ष जाधव, अनन्या बामणे, प्रणाली उंडरे. तसेच पदवी पदवीका विद्यार्थी तेजस गोसावी, कृपाली जाधव, प्राची वाढवळ, चैतन्य देशमुख, डॉ. कुणाल गवळी आदींना आकर्षक सन्मान चिन्ह, रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

**निवडक**

### कोयताधारी टोळी सक्रिय

**पनवेल :** तालुक्यात अनेक दिवसांपासून एकाचवेळी अनेक घरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. अशातच खारघर वसाहतीलगत असणाऱ्या पेठ गावात गुरुवारी मध्यरात्री हातामध्ये कोयता आणि चोरीचे इतर साहित्य घेऊन बनियानधारी टोळीतील चौघेजण फिरताना सीसीटीव्ही कॅमेराम ध्ये कैद झाल्याने रहिवाशांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. या टोळीने गुरुवारी मध्यरात्री पेठ गावात अनेक घरांत चोऱ्या केल्याचे समोर आले आहे. नागिरकांमध्या दहशतीचे वातावरण आहे.

### भावाकडून बहिणीवर अत्याचार

**पनवेल :** तालुक्यातील सूकापूर परिसरातील मालेवाडी एका २३ वर्षीय मुलीवर चुलत भावाने अत्याचार केल्याची घटना घडली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात शुक्रवारी पहाटे बलात्काराचा गुन्हा दाखल झाला. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. मालेवाडी येथील २३ वर्षीय तरुणाने चुलत बहिणीचा विश्वास संपादन करुन तीला प्रेमसंबंधात गुंतवले. मागील वर्षी ३० ऑक्टोबर ते १७ जुनपर्यंत त्याने भाड्याने घर घेतले होते. तेथे अत्याचार केल्याचे पिडीतेने पोलीसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

### एसटी कामगारांचा घंटानाद

**पनवेल :** दर महिन्याच्या वेतनाची ७ नव्हे तर १० तारीख उलटूनही राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना जून महिन्याचे वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी पनवेल आगार येथे घंटानाद करुन आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक ऋतूमध्ये तसेच सणासुदीत एसटी गाड्या चालवून प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी सूरक्षित पोहोचविणाऱ्या एसटी कामगारांना मागील महिन्याचे वेतन न मिळाल्याने एसटी कामगारांसोबत प्रवाशांच्यावतीने संताप व्यक्त केला जात आहे.

### पंढरपूर यात्रेसाठी गाड्या

**श्रीवर्धन :** बुधवार १७ रोजी आषाढी एकादशी आहे. पंढरपूरच्या यात्रेसाठी श्रीवर्धन आगाराने ज्यादा एसटी गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. त्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. १४, १५ व १६ जुलैरोजी रोज सकाळी ९ वाजता श्रीवर्धन-शेखाडीमार्गे पंढरपूर, तर १४ रोजी स.११ वाजता श्रीवर्धन-म्हसळामार्गे पंढरपूर आणि १६ रोजी सकाळी ८ वा श्रीवर्धन-म्हसळामार्गे पंढरपूर असे नियोजन केले आहे. भाविकांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा.

### विद्यार्थ्यांसाठी निवडणूका

**रसायनी :** चौक येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलने अपेक्षित असलेल्या २०२४ च्या विद्यार्थी निवडणुकांचे आयोजन केले होते. ज्यात स्कूल कॅप्टन, व्हाईस स्कूल कॅप्टन, स्कूल स्पोर्ट्स कॅप्टन, व्हाईस स्कूल स्पोर्ट्स कॅप्टन, स्कूल डिसिप्लिन कॅप्टन, व्हाईस स्कूल डिसिप्लिन कॅप्टन, स्कूल कल्चरल कॅप्टन आणि व्हाईस स्कूल कल्चरल कॅप्टन या पदांसाठी निवड करण्यात आली. एका भव्य सभेत या संबंधीचा निकाल जाहीर करण्यात आला.

# माथेरानमध्ये पर्यटकांची मांदियाळी

**। माथेरान । वार्ताहर ।**

**पावसाळ्यात निसर्गाच्या सानिध्यात रिमझिम जलधारा अंगावर झेलण्यासाठी आणि इथल्या निसर्गरम्य वातावरणात निसर्गाशी जवळीक साधण्यासाठी पर्यटकांनी दुसऱ्या शनिवारी असलेल्या सुट्टीच्या दिवशी माथेरानला पसंती दिली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्यामुळे एकप्रकारे पर्यटकांची मांदियाळी असल्याचे पहायला मिळाले.**



काही ठिकाणी धबधब्यावर अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे त्याठिकाणी पर्यटकांना पर्यटनासाठी मज्जाव केल्याने सर्वांनी जवळचे पर्यटनस्थळ म्हणून माथेरानला पसंती देत मोठया प्रमाणावर गर्दी केलेली दिसत आहे. सकाळपासून गावात रूम्स शोधण्यासाठी सर्वांची लगबग सुरु होती. अनेकांना रूम्स अभावी निराश होऊन माघारी जावे लागल्याने इथल्या निसर्गाशी हितगुज साधता आली नाही.

जेमतेम आठ ते दहा हजार पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाल्यास हे ठिकाण हाऊसफुल्ल होऊन जाते. घाटातुन वर येणाऱ्या खाजगी वाहनांना सुलभपणे जागा उपलब्ध करून देण्यासाठी पार्किंग मध्ये वनखात्याने आपल्या परीने प्रयत्न केले तर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सुध्दा चोख बंदोबस्त ठेऊन होते. दस्तुरीपासून गावात येण्यासाठी कुणी ई रिक्षाच्या साहाय्याने तर हौशी पर्यटक घोड्यावर बसून येत होते. पॉईंट्सवरील नयनरम्य देखावे न्याहाळण्यासाठी अनेकजण पायी चालत जाण्याची मजा घेत होते. मुख्य पॉईंट असणाऱ्या इको पॉईंट तसेच शारलोट लेक या ठिकाणी पर्यटकांची तोबा गर्दी दिसत होती. छोट्या-छोट्या स्टॉलधारकांना उत्तम प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

> खरोखरच माथेरानमध्ये पावसाळ्यातील आल्हाददायक वातावरण आणि हवेतील गारवा मनाला ताजेतवाने करत असतो. दाट धुक्यामुळे आपण एका वेगळ्याच दुनियेत असल्याचा भास झाला. एक ते दोन दिवस मुक्कामासाठी हे ठिकाण उत्तम आहे. आम्ही खूपच एन्जॉय केला.
>
> –ऐश्वर्य बांदल
> पर्यटक मुंबई

उन्हाळ्यात जेवढा व्यवसाय मिळत नाही. त्यापेक्षाही पावसाळ्यात चांगल्या प्रकारे उत्पन्नाचे साधन पर्यटकांच्या माध्यमातून मिळत असल्याचे स्टोल्स धारक बोलत आहेत. एकंदरीत सर्वांना पावसाळ्यात शनिवार आणि रविवार यादिवशी उत्पन्न लाभत आहे. ट्रेन सोबत फोटो काढण्यात अनेक पर्यटक मशगुल असल्याचे दिसून आले.

# कर्जत तालुक्यात पावसाचा जोर

## अनेक छोट्या-मोठ्या पुलावरून पाणी गेल्याने वाहतूक बंद

**। नेरळ । वार्ताहर ।**

दोन दिवस सतत कोसळणाऱ्या पावसाने कर्जत तालुक्यातील नद्यांना पूर आला असून या पुरात अनेक छोटे-मोठे पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे अनेक गावातील वाहतुकीचा मार्ग बंद झाल्याचे पाहायला मिळाले, अनेक ठिकाणी भात लावणीची कामे सुरु असताना मोठा पूर झाल्याने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे.



नेरळ, दहिवली, मोहिली, आवलंस अशा अनेक छोट्या मोठ्या पुलानवरून पाणी गेल्याने वाहतून पूर्णपणे बंद झाली होती. कर्जत शहरातील अनेक सोसायटीत मध्ये पाणी शिरले होते. तर मोहिली, बीड गावात देखील पाणी शिरल्याने अनेक नागरिकांची तारांबळ उडाली होती. पुराच्या पाण्यात अनेक जणांची कोंडी झाली, तर अनेक चाकरमान्यांचे नुकसान देखील झाले आहे. अनेक ठिकाणच्या पुलानवरून पाणी गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. परिणामी अनेक गावांचा यामुळे संपर्क तुटला होता, आज रविवार असल्याने शाळांना सुट्टी होती. त्यामुळे विद्यार्थी वर्गाला थोडा दिला मिळाला. परंतु पुरामुळे शेती वाहून गेल्याने शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे.

# वरचा देऊळवाडा ग्रामस्थांचा विधायक उपक्रम

■ **स्मशानभूमीची साफसफाई, परिसरात वृक्षारोपण**



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

पालीतील वरचा देऊळवाडा येथील ग्रामस्थ मंडळ यांनी येथील स्मशानभूमीची साफसफाई व स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपणाचे विधायक सामाजिक कार्यक्रम नुकतेच राबवले आहे.

या वृक्षारोपणाकरीता स्थानिक नगरसेविका मधुरा अमीर वरंडे यांनी नगरपंचायत पालीमार्फत ५० वृक्ष उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्राम स्थांनी त्यांचे आभार मानले. तसेच गावातील वयोवृध्द व तरुणांनी या कामात खूप मेहनत घेतली. भर पावसात त्यांनी कामे केली.

उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी एकत्र येऊन सामाजिक एकोपा जोपासत एक आदर्श घालून दिला आहे. या विधायक उपक्रमासाठी राजाराम चव्हाण (वय ८६), आप्पा चव्हाण, विठोबा गायकवाड, विनायक राऊत, अमित वरंडे, अविनाश अशोक दंत, सुरेश गायकवाड, शुभम वरंडे, आर्यन जाधव, गौरव वाघमारे, संदेश वरंडे, सर्वेश राऊत, सूरज वरंडे या सगळ्यांनी खूप मेहनत घेतली.

## भेंडखळ ग्रामपंचायतीने केले वृक्षारोपण



**उरण :** निसर्गाचे, पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व्हावे, पर्यावरण संरक्षण विषयक जनजागृती व्हावी या अनुषंगाने भेंडखळ ग्रामपंचायतीच्यावतीने ठाणकेश्वर मैदान येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमास भेंडखळ ग्रामपंचायतीच्या सरपंच मंजीता पाटील, उपसरपंच अक्षता ठाकूर, ग्रामपंचायत सदस्या प्राची ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य दिपक ठाकूर, अजित ठाकूर, लिलेश्वर भगत, अभिजीत ठाकूर, ग्रामपंचायत सदस्या संगीता भगत, सोनाली ठाकूर, प्राची ठाकूर शितल ठाकूर, स्वाती घरत, स्वाती पाटील, ग्राम विकास अधिकारी किरण केणींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# दहिवली विचारमंचच्या माध्यमातून वृक्षारोपण



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

दहिवली गाव परिसर विचारमंचच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. बहुतांश नागरिकांनी एकत्र येते वाचनालय, डोंबे विद्यानिकेतन, छत्रपती शिवाजी महाराज नगर, नवीन गार्डन, प्रभु छाया सोसायटी रोड व बाम मळा, नवीन डीपी रोड येथे ३५ रोपांची लागवड केली. त्यामध्ये वड, पिंपळ, करंज, शीसंम, आवळा, पेरू, जांभुळ, बदाम आदी पारंपारिक झाडांचा समावेश होता.

मल्हारी माने, अशोक पाटील, अशोक पवार, प्रसाद डेरवणकर दामोदर कारुळकर, रमेश भागवत, चंद्रकांत जाधव, विकास चित्ते, अशोक महाडीक, सुनील जाधव, निवृत सैनिक अशोक म्हसे, अतुल पवार, जयप्रकाश जाधव, शेखर

मेढी, मिलींद चिखलकर, बाळा धनवे, दिनेश कडु, पोलीस पाटील अनिल सावंत, सुशांत लाड, नंदु गुरव, संजय वरघडे, गणेश कनोजे, संदिप पावसकर यांच्यासह अन्य मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील जामरुंग येथील प्रभाकर पाटील माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मुंबई येथील माहेश्वरी प्रगती मंडळ आणि गोरेगाव युवा समितीच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

मुंबई येथील माहेश्वरी प्रगती मंडळ आणि गोरेगांव युवा समिती यांच्यावतीने कार्यक्रम पार पडला. प्रभाकर पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला माहेश्वरी प्रगती मंडळाचे दिलीप माहेश्वरी, राजेश बल्दवा, डिंपल तोतला, अनुसुया माहेश्वरी, मंगेश सावंत, संतोष पिंपरकर, विद्यार्थी, पालक तसेच महेश्वरी प्रगती मंडळ आणि गोरेगाव युवा समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# लायन्स क्लब मांडवाच्या अध्यक्षपदी जितेंद्र ठाकूर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब मांडवाचा सन २०२४-२५ या लायन वर्षाचा पदग्रहण व शपथविधी सोहळा बुधवारी १० जुलै २०२४ रोजी स्वागत गेस्ट हाऊस किहीम-अलिबाग येथे पार पडला. याप्रसंगी जितेंद्र ठाकूर यांनी लायन्स क्लब मांडवाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली.



याप्रसंगी ८ नवीन सदस्यांनी शपथग्रहण केली. या पदग्रहण व शपथविधी सोहळ्यासाठी आषाढ वारीची थीम साकारली होती. समारंभासाठी माजी प्रांतपाल मुकेश तनेजा, द्वितीय उपप्रांतपाल प्रवीण सरनाईक, रिजन चेअरपर्सन विजय वनगे, झोन चेअरपर्सन प्रीतम गांधी, डिस्ट्रिक्टसेक्रेटरी उमंग देसाई, डी.सी. साईट, ए.एस.एन. मूर्ती, जी.एम.टी. को.ऑरडीनेटर अनिल म्हात्रे, नयन कवळे, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी आदी मान्यवर विशेष पाहुणे लाभले होते. तसेच माजी अध्यक्ष अभिजित गुरव, आमिष शिरगावकर, अरविंद घरत, सुबोध राऊत, विद्या अधिकारी, जितेश्री ठाकूर, विनिता पाथरे, अमरेष शिरगावकर, प्रिति पाटील, सतीश म्हात्रे, कुणाल पाथरे, मोहन पाटील, मानसी पाटील, विलास पाटील, उज्वला पाटील, मृदुला राऊत, मोहिनी गुरव, समता राऊत, साक्षी शिरगावकर, गीता कुलपे, अजय आंगणे, नितीन दांडेकर, डॉ .राजेंद्र मोकल, वृंदा मोकल, सुहानी म्हात्रे, स्मितल शिरगावकर, हेमा घरत, निलेश खोत, चंद्रकांत मल्हार, विनायक खोपकर यांच्यासह सुधीर पुरो, सुनीता पुरो, रवींद्र म्हात्रे, रुतीका म्हात्रे, वैष्णवी खोपकर हे नवीन सदस्य तसेच लायन्स क्लब अलिबाग, अलिबाग डायमंड, लायन्स क्लब पोयनाड, श्रीबाग सेंटिनिअल, क्लबचे पदाधिकारी व सिनिअर सदस्य उपस्थित होते.

याप्रसंगी लायन्स क्लब मांडवाच्या नवीन सदस्यांचा शपथविधी व अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचे पदग्रहण करण्यात आले. लायन्स क्लब मांडवाचे नवनिर्वाचित अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष ऋग्वेद ठाकूर, सचिव निकिता पाटील, खजिनदार प्रदीप पाटील यांनी आपापल्या पदाची सूत्रे हाती घेतली. याप्रसंगी एकूण २४ सदस्यांनी पदभार स्वीकारला.

याच कार्यक्रमात लायन्स क्लब मांडवाने आपल्या कार्यक्षेत्रात मोहित मनोज गुरव (५०००/-), अनुष्का हृषीकेश पवार (७०००/-), स्वरा संजय भोष्टेकर (१५०००/-) या तीन गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थ सहाय्य करून पुढील शिक्षणासाठी मोलाचे सहकार्य करून स्पॉट ऍक्टिव्हिटी यशस्वी केली.

# खारघरमध्ये वाहतूक नियमन शिकवणारे पहिले उद्यान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक विद्यार्थी संख्या असणाऱ्या पनवेलमध्ये महापालिका प्रशासन वाहतूक नियमनाविषयी बालकांना साक्षर करणारे पहिले वाहतूक नियमनांचे (ट्रॅफीक) उद्यान खारघर वसाहतीमध्ये उभारणार आहे.




खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ ए येथील ९५०० चौरसमीटर जागेवर हे उद्यान उभारले जात आहे. प्रादेशिक परिवहन विभागाने याबाबत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या उद्यानाची मागणी केली होती. त्यानंतर पनवेल महापालिका प्रशासनाने हे उद्यान बांधण्याचा निर्णय घेतल्याची माहिती पनवेल महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी दिली. पनवेलमध्ये २६० हून शाळा व महाविद्यालये आहेत. सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थी संख्या असलेल्या पनवेलमधील विद्यार्थ्यांना बालवयापासून वाहतूक नियमनाची साक्षरता असल्यास येथील अपघात टाळता येतील.

प्रादेशिक परिवहन विभागाने बालकांना शालेय जिवनात उद्यानातील खेळातून वाहतूक नियमनाचे धडे मिळू शकतील यामुळे ट्रॅफिक पार्कची संकल्पना आखण्यात आली. या पद्धतीचे पार्क ठाणे महापालिकेने उभारले आहे. पनवेल महापालिका प्रशासनाने या ट्रॅफीक पार्कसाठी पुढाकार घेतला असून पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी या पार्कसाठी विशेष पुढाकार घेतला आहे. सिडको मंडळाकडून खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ येथील भूखंड क्रमांक ९ ए येथे उद्यानाचा भूखंड महापालिकेला मिळाला होता. त्याच उद्यानाच्या भूखंडावर वाहतूक नियमनाची माहिती विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी महापालिका सुमारे १६ कोटी रुपये खर्च करणार आहे. पालिकेने या ट्रॅफिक पार्कचा आराखडा बनविण्यासाठी असिम गोकार्ण यांची नेमणूक केल्यावर गोकर्ण यांनी ट्रॅफिकपार्कचा आराखडा निश्चित करुन पालिकेकडे सुपुर्द केल्यावर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी या पार्कच्या बांधकाम निविदा प्रसिद्धीला आयुक्त चितळे यांनी मंजूरी दिल्याची माहिती महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी दिली. पालिका हे पार्क उभारण्यासाठी १५ कोटी ८१ लाख रुपयांचा बांधकाम खर्च करणार आहे.

दोन दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाने या ट्रॅफीक पार्कच्या बांधकामासाठी निविदा प्रसिद्ध केली असून पुढील दोन वर्षात या ट्रॅफीकपार्कचे बांधकाम पुर्ण करण्याचे पालिकेचे उदिष्ट आहे. हे ट्रॅफीक पार्क उभारणीची विशेष तरतूद महापालिका प्रशासनाने २०२३ २०२४ च्या शहरातील मूलभुत सोयी सुविधेअंतर्गत केली होती. सध्या सेंट्रलपार्क या भव्य उद्याणामुळे खारघर आणि पनवेलला ओळख मिळाली आहे.

पनवेल महापालिका विकसित करत असलेल्या ट्रॅफिक पार्कमुळे पनवेल व परिसरातील शेकडो शिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांच्या सहलींचे भविष्यातील नियोजन आखले जाईल.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे.** पगार ७५००-९००० मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- **वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये** काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९७६२७७७९७५
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चरल** फर्मकरीता ऑटोकॅड ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क- ९४२२०९४१५१, ९२७०८२७८२९.
- **शॉप भाडेने देणे आहे.** आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६
- **रसिक हार्डवेअर अलिबाग** ९४२२६९०८५४, दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे.
- **Design Metrics is Hiring!** Need a gradute Architect or Intern at our Studio in Alibag. Skills required - Autocad, sketchup, Photoshop & ms office. Kindly Share your CV and Portfolio on designmetricsoffice@gmail.com Contact No - 9970051876

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## चोरढे शाळेचा अभिनव उपक्रम

# विठ्ठल नामाच्या गजरात चिमुकल्यांची निघाली दिंडी...

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

शालेय विद्यार्थीमध्ये लहान वयातच भक्तिभावाची भावना वाढीस लागावी, मुलांना मोबाईलपासून दूर करून भक्तिमार्गात आणावे तसेच त्यांचे आभ्यासाकडे लक्ष वळवावे या उदात्त हेतूने चोरढे शाळेतील शिक्षकांसह शाळा व्यवस्थापन समितीने चोरढे गावातून दिंडी काढली होती.

मुरुड तालुक्यातील चोरढे रायगड जिल्हा परिषद शाळेत दही हंडी उत्सव, ग्राम स्वच्छता, रक्षाबंधन लोकसहभाग, वृक्षारोपण असे विविध उपक्रम शाळा राबवत असते. सन २०२३-२०२४ ची मुख्यमंत्री 'माझी शाळा, आदर्श शाळा' यायोजनेत शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. आषाढी एकादशीला विविध वारकरी दिंडीला जात असतात. त्याच्या सहकार्याने दिंडीचे आयोजन केले होते.



विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठला हरी नाम विठ्ठला, हरी ओम् विठ्ठला, ज्ञानोबा माऊली तुकाराम आशा विविध जयघोषाने संपूर्ण चोरढे गाव दुमदुमूला. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून गावच्या सरपंच तृप्ती घाग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश तांबडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थिती होते.गावातील भजनी मंडळ, ग्रामस्थ, पालक, वारकरी यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

यावेळी शोभा पंची यांनी १० किलो फरसाण व केसरीनाथ आंबलीकर यांनी विद्यार्थ्यांसाठी ६४ टोप्या दिल्या. तसेच देवांश चोरढेकर यांनी पालखीची सजावट केली. शाळेपासून दिंडीला सुरुवात झाली. ढोलकी व टाळांच्या गजरात गावातील लोकांच्या जनसमुदात संपूर्ण गावात फिरून आल्यावर चोरढे एसटी थांबा येथे दिंडीची सांगता करण्यात आली.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका संगीता भगत, विजय जाधव, रमेश सुभेदार, राजेंद्र नाईक, प्रतिभा वर्तक, जयश्री पंची यांनी योग्य नियोजन केले. गट शिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

# पांडवकडा परिसरात वन कर्मचारी तैनात

## पोलिसांकडून बंदी असल्याचे फलक

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरमधील पांडवकडा धबधबा परिसरात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी पनवेल वन विभागातर्फे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तर, खारघर पोलिसांकडून धोकादायक पर्यटनस्थळावर जाण्यास बंदी असल्याचे फलक खारघर परिसरातील पांडवकडा धबधबा परिसर तसेच रस्त्यावरील दर्शनी भागात लावण्यात आले आहेत.

दरम्यान, खारघर येथील पांडवकडा धबधबा, आजुबाजूचा नयनरम्य निसर्ग परिसर नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील हजारो पर्यटकांचा पावसाळी पर्यटनासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. पाऊस चांगला रुळल्यावर पर्यटकांचा ओघ पांडवकडा धबधब्याकडे चालू होतो. मात्र, खारघर परिसरातील तलाव तसेच पांडवकडा धबधब्याच्या प्रवाहात गेल्या १५ वर्षात तीसपेक्षा अधिक पर्यटक वाहून गेल्याची घटना घडली आहे. विधानसभा सभागृहात पुणे येथील धबधब्याचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानंतर रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार वन विभागाकडून पांडवकडा धबधबा परिसरात दोन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच खारघर पोलिसांकडून पांडवकडा धबधबा आणि तलाव परिसर पर्यटन प्रतिबंधीत क्षेत्र घोषित करुन मनाई आदेशाचे फलक लावण्यात आले आहेत.



> पांडवकडा धबधबा परिसरात दुर्घटना घडू नये यासाठी वनविभागाकडून दोन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.
> – डी.एस. सोनावणे, वन परिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, पनवेल

## फसाबाई डामसे यांचे निधन

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे नेते, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे यांच्या मातोश्री फसाबाई राजाराम डामसे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी त्यांच्या कोठिंबे येथील गावी जाऊन पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी विविध राजकीय पक्षातील नेते मंडळी, वैद्यकीय, क्रीडा, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती.



## विद्यार्थ्यांना छत्र्या, खाऊचे वाटप

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा शिवनगर येथील जय प्रिसेजन प्रोडक्ट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्यावतीने शिवनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना छत्री व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी शालेय मुख्याध्यापिका रजनी गायकवाड, जय प्रिसेजनचे एचआरहेड सुनील गायकवाड, एचआर चित्रा मैदर्गीकर, प्रोडक्शन इन्चार्ज मीनल सावंत, उत्पादन विभागाचे प्रमुख मंजिंदर सिंग, सेफ्टी डिपार्टमेंटचे सुनील सिंग, उत्पादन विभागाचे विजय कांबरे, शिक्षक मंदार वेदक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘लाडकी बहीण’ योजनेबाबत मार्गदर्शन



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

महिलांचे सरंक्षण व त्यांची प्रगती यासाठी महाराष्ट्र सरकार सदैव तत्पर असते. नुकतीच महाराष्ट्र सरकारतर्फे महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेमार्फत महिलांना १५०० रुपये मिळणार आहेत.

याच योजनेची जनजागृती व जास्तीस्त जास्त महिलांना याचा लाभ मिळावा या हेतूने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग आणि महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ जुलै रोजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अंगणवाडी सेविका आरती लोटणकर यांनी योजनेची संपूर्ण माहिती व लागणारी आवश्यक कागतपत्रे याची माहिती देऊन ऑनलाइन फॉर्म भरण्याचे प्रशिक्षण महाविद्यालयातील मुलींना देण्यात आले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मार्फत सदर योजनेचा प्रसार आणि प्रचार मुरुड परिसरातील गावखेड्यांमध्ये होऊन अधिकाधिक महिलांना या योजनेचा लाभ व्हावा, या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख यांनी प्रास्ताविकाद्वारे योजनेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. रहिम बागवान यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला विकास कक्ष प्रमुख डॉ. स्वाती खराडे व विद्यार्थी प्रतिनिधी हुमेरा घारे, सहिमा मुकादम, अरफा कलबसकर यांनी परिश्रम घेतले.

## सर्पमित्राने दिले सापाला जीवदान

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पालीतील ग.बा. वडेर हायस्कूलमध्ये गुरुवारी (दि. ११) सकाळी ७ वाजताच्या सुमारास एक साप शिरला होता. या सापाला पाहून शिक्षक व विद्यार्थी घाबरले होते. मात्र, पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी या सापाला शिताफीने पकडून सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडले.



हा छोटा अजगर जातीचा साप होता. त्याने उंदीर खाल्ला होता. त्यामुळे त्याला जलद हालचाल करता येत नव्हती. दत्तात्रय सावंत यांना शिक्षक दिलीप जगताप यांनी शाळेत साप आल्याची माहिती दिली. तर, शिक्षक महेश बारमुख हे सावंत यांना शाळेत घेऊन आले.

# क्रियाशील प्रेस क्लबच्यावतीने मुख्य अभियंतांचा सन्मान

## आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपत्र प्रदान

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेच्या शहर अभियंता या पदावर कार्यरत असणारे संजय कटेकर यांना पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रियाशील प्रेस क्लब पनवेलच्यावतीने गौरविण्यात आले. यावेळी संजय कटेकर यांच्या ३२ वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीचा प्रवास मांडणाऱ्या लेखाची फ्रेम देऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी क्रियाशील प्रेस क्लब पनवेलचे संस्थापक अध्यक्ष तथा वादळवाराचे संपादक विजय कडू, अध्यक्ष तथा पुण्यनगरीचे पत्रकार साहिल रेळेकर, सरचिटणीस तथा रत्नागिरी (रायगड) टाइम्सचे पत्रकार राज भंडारी, अभेद्य प्रहार वृत्तपत्राचे संपादक प्रकाश म्हात्रे, दैनिक प्रहारचे पत्रकार चंद्रकांत शिर्के, साप्ताहिक रायगड संदेशचे संपादक विशाल सावंत, रायगड टुडे व वादळवारा लाईव्ह चॅनेलचे संपादक क्षितिज कडू आदी पत्रकार उपस्थित होते.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे हे संजय कटेकर यांची प्रशंसा करताना म्हणाले की, संजय कटेकर यांची प्रशासकीय कारकीर्द समस्त भूमीपुत्रांसाठी प्रेरणादायी आहे. ते शहर अभियंता व्हावेत ही भूमीपुत्रांची पूर्वीपासूनच इच्छा होती. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. तर ज्येष्ठ पत्रकार विजय कडू म्हणाले की, संजय कटेकर यांचा तत्कालीन पनवेल नगरपालिकेच्या काळातील कनिष्ठ अभियंता ते आज महापालिकेच्या काळातील मुख्य अभियंता हा प्रवास मी अत्यंत जवळून पाहिला आहे. त्यांच्या या गगनभरारीमुळे भूमीपुत्रांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# कोलाड खांब परिसरात विजेचा सावळागोंधळ

## ग्राहकांना सर्व्हिस देण्यास कर्मचाऱ्यांची टाळाटाळ

। कोलाड । वार्ताहर ।

महाराष्ट्र विद्युत महामंडळाचा कारभार आहे तरी कसा तर कोलाड सबस्टेशनमधून कोलाड खांब देवकान्हे परिसरात विजेचा सावळागोंधळ असल्याने ग्राहकांना सर्व्हिस देण्यास संबंधित खाते तसेच कर्मचारीवर्गातून नियमितपणे टाळाटाळ करण्यात येत आहे. याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल आता ग्रामीण भागातील वीज ग्राहकांकडून व्यक्त केला जात आहे.

कोलाड खांब देवकान्हे परिसरात अनेक गावे ही ग्रामीण भागात वसलेली आहेत, त्यामुळे ऐन पावसाळ्यात नेहमीच विजेचा सावळागोंधळ असल्याने ग्राहकांना होत असलेला वीजपुरवठा खंडित झाल्याने त्यांना रात्री-अपरात्री अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून, यावर नियंत्रण कोणाचे, तर दुसरीकडे विद्युत महामंडळाच्या वतीने नेमण्यात आलेले खासगी कर्मचारी हेदेखील वेळीच ग्राहकांच्या तक्रारींचा निवारण करत नसल्याने तसेच त्यांना वेळीच सेवा देत नसल्याने अधिक मोठी समस्या ग्राहकांसमोर उभी राहात आहे. दरम्यान, संबंधित नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना संपर्क साधला की त्याला उलटसुलट उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे गावागावातून महावितरणच्या गलथान आणि कामचुकारपणाबद्दल एकच संतापाची भावना व्यक्त केली जात आहे.

तरी संबंधित खात्याच्या सब डिव्हिजनच्या कनिष्ठ अभियंता अथवा वरिष्ठ अधिकारी वर्गाने याकडे लक्ष केंद्रित करून येथील नागरिकांना वेळोवेळी सेवा देण्यासाठी तसेच त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अधिक लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# चावणे येथे भातपीक प्रात्यक्षिक प्रशिक्षण शिबीर

। रसायनी । वार्ताहर ।

पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी चावणे येथे यूएनडीपी अंतर्गत भातपीक प्रात्यक्षिक शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या भक्ती म्हात्रे यूएनडीपी प्रकल्प सहयोगी (कृषी) यांनी यूएनडीपी प्रकल्पाबाबत माहिती दिली, तसेच भातपिकाच्या पद्धतीबाबत मार्गदर्शन केले.

दरम्यान, भगवान हेगडे, मंडळ कृषी अधिकारी, पनवेल यांनी भातलागवडीच्या विविध पद्धती व त्यामधील खतव्यवस्थापन व किडरोग व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले. म.ग्रा.रो.ह.यो लागवड व भातपीक विमा १५ जुलैच्या आत लवकरात लवकर काढण्यासाठी शेतकऱ्यास विनंती केली व कृषी विभागातील योजनांबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास के.टी. बिचूकले कृप पनवेल २, सचिन पवार तंत्र सहाय्यक पनवेल, दिनेश ढालपे, कृस तारा, विजय नलावडे ग्रामसेवक, केशर पाटील, गीता ठाकूर एनजीओ प्रेरणा संस्था प्रतिनिधी तसेच चावणे सरपंच सुप्रिया सोनावळे, सदस्य गणेश सरदार, भगवान देशमुख, प्रगतीशील शेतकरी व शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम

। रसायनी । वार्ताहर ।

सेंट विन्सेंट पलौटी शाळेमध्ये गुरुवार, दि. ११ जुलै रोजी इन्वेस्टीचर सेरेमनी आयोजित केली गेली होती. यामध्ये पहिली ते दहावी वर्गापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यामध्ये शालेय विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थी-उपप्रतिनिधी, पिवळा हाऊस, निळा हाऊस, लाल हाऊस, केशरी हाऊस प्रतिनिधी- उपप्रतिनिधी, खेळ सचिव, सांस्कृतिक सचिव, खजिनदार, शिस्त सचिव, सरचिटणीस, वर्ग प्रतिनिधी यांची निवडणूक केली गेली. रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शाळेचे व्यवस्थापक फादर थॉमस मिरांडा, शाळेचे मुख्याध्यापक फादर जोएल वास व फादर सायमन लोबो यांनी पुष्पगुच्छ, शाल व शाळेचे स्मृतिचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

निवड झालेल्या प्रतिनिधीने आपले कर्तव्यपूर्ण निष्ठेने पार पाडण्याची शपथ घेतली. अंशुमन बेहरा याला शालेय विद्यार्थी प्रतिनिधी व श्रुती शिर्के हिला शालेय उपप्रतिनिधी ही पदवी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात वेगवेगळे नाटक व नृत्य सादर केले.

# न्यायासाठी आमरण उपोषणाचा इशारा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

सात दिवसांत न्याय न मिळाल्यास कोकण आयुक्तांच्या कार्यालयासमोर कुटुंबियांसह आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा अंकुश कातकरी यांनी दिला आहे. उरण तालुक्यातील चिर्ले येथील रहिवासी संजय पाटील यांच्याकडे अंकुश कातकरी हे १५००० रुपयांच्या मासिक पगारावर केअर टेकर म्हणून काम करीत आहेत. या दरम्यान ते आपल्या कुटुंबियांसह जांभुळपाडा येथील संजय पाटील यांच्या शेतजमिनीच्या ठिकाणीच वास्तव्य करीत होते.

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रकरणी तक्रारीनंतरही ३७ दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र, उरण पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने अखेर अंकुश कातकरी यांनी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग व समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे टेकाळी तालुका अलिबाग येथील खालील वर्णनाच्या भातशेती व वर्कशी मिळकती श्री. नवझर जमशेद मानिकशाँ रा चौथा मजला, प्रीन्सिस बिल्डींग, २७५ प्रीन्सिस स्ट्रीट मुंबई ४०० ००२ यांचे नावे ७/१२ चे दफ्तरी कब्जेदार म्हणून दाखल आहेत. मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान कब्जेदार श्री. नवझर जमशेद मानिकशाँ यांचाच आहे असा भरवसा त्यांनी खालील सही करणार श्री. संजीव माधव जोशी (ॲडव्होकेट-अलिबाग) यांना दिलेला आहे. सदर मिळकतींचा मालकी हक्काचा शोध घेण्याकरिता आणि त्याप्रमाणे Titale-Report देण्याकरिता श्री रणजित प्रभाकर राणे, रा. आवास यांनी सांगितल्याप्रमाणे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतींचे वर्णन**

| कब्जेदार यांचे नाव | गट नं. | एकूण क्षेत्र (हे आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | १५ | ०-०१-५० | ०.०२ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | १६ | ०-०१-५० | ०.०३ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | १७ | ०-१५-५० | २.७५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | १८ | ०-०९-२० | २.०२ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | १९ | ०-०८-५० | १.८५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २० | ०-०७-५० | १.६९ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २१ | ०-०७-०० | १.५५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २२ | ०-०८-५० | १.८५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २३ | ०-१०-१० | २.२५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २६ | ०-०६-०० | ०.५९ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २७ | ०-०५-०० | ०.४७ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २८ | ०-०८-०० | ०.८१ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | २९ | ०-०४-०० | ०.०७ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | ३० | ०-०६-७० | ०.९५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | ३१ | ०-०९-५० | ०.९५ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | ३३ | ०-११-२० | १.०४ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | ३४ | ०-०८-५० | ०.९३ |
| श्री. नवझर जमशेद मानिकशाँ | ३५ | ०-१५-२० | ०.५६ |

तरी सदर मिळकतींबाबत कोणाचाही गहाण, दान,बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार अगर तत्सम प्रकारचा कोणताही करार व हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे लेखी हरकत दाखल करावी अशा प्रकारे वरील मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास मिळकतींची मालकी व ताबा कब्जा विद्यमान कब्जेदार श्री. नवझर जमशेद मानिकशाँ यांचाच आहे असे गृहीत धरुन मालकी हक्क बाबतचा दाखला (Title-Report ) दिला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : १२-०७-२०२४

सही/-
**(संजीव माधव जोशी)**
(ॲडव्होकेट अलिबाग)
२ रा मजला, राधिका बिल्डींग, एस.बी.आय
श्रीबाग शाखेसमोर, श्रीबाग नं. ३, अलिबाग

# फळबाग लागवड योजना शेतकऱ्यांसाठी संजीवनी

## तालुक्यात आतापर्यंत ४०२ शेतकऱ्यांनी घेतला लाभ

। महाड । वार्ताहर ।

**महाड तालुक्यामध्ये एकीकडे भातशेती पडीक राहण्याचे प्रमाण वाढत असतानाच दुसरीकडे मात्र शासनाच्या फळबाग लागवड योजनेतून शेतकऱ्यांना जीवनदान मिळत आहे. या योजनेमधून आतापर्यंत ४०२ शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. पडीक जमीन आणि पडीक शेतजमीन यामध्ये फळ रोपांचे लागवड करून शेतकरी उत्पन्न घेऊ लागले आहेत.**



शासनाकडून राबवली जाणारी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजना शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत आहे. महाड तालुका कृषी कार्यालयाकडून याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले जात आहे. नाते रायगड विभागामध्ये कृषी सहाय्यक ए.बी. रुपणर यांनी याबाबत मोलाचे काम केले आहे. महाड तालुक्यात गतवर्षापर्यंत सुमारे ४०२ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमधून या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना दिला जात आहे. आंबा, काजू, चिकू, नारळ, आवळा, कोकम, फणस फळांच्या रोपांचा समावेश यामध्ये करण्यात आलेला आहे. फळ रोपांची शास्त्रोक्त पद्धतीने कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली लागवड केलेली आहे. महाड तालुक्यामध्ये ४०२ शेतकऱ्यांमार्फत आतापर्यंत १७९.६९ क्षेत्रावर ही लागवड झाली आहे.

> कोकणात घेतले जाणारे भातपीक मोठ्या प्रमाणावर असले तरी शेतकऱ्यांनी आपल्या पडीक जमिनीमध्ये किंवा जे शेतकरी भातशेती करत नसतील त्यांनी या योजनेतून फळबाग लागवड करून उत्पन्न घेतले पाहिजे.
> – ए.बी. रूपनर, कृषी सहाय्यक, महाड

> या योजनेमधून मी आंबा रोपांची लागवड केली आहे. या योजनेतून नक्कीच उत्पन्न मिळणार असल्याने अन्य शेतकऱ्यांनी देखील लाभ घेतला पाहिजे.
> – सुनील बाटे, शेतकरी


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या–कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-खुली निविदा मागवण्याची सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्या वतीने पुढील कामासाठी खुली ई-निविदा मागवत आहे: **कामाचे नाव:** कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील वैभववाडी यार्ड येथे प्रस्तावित एफओबीच्या बांधकामामुळे ओएचई सुधारणा काम. **निविदा क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/13/2024 दि. 15/07/2024. अंदाजे किंमत:** ₹ 17,27,954/- (जीएसटी वगळून). **निविदा फॉर्मची किंमत:** NIL. **EMD:** ₹ 34,600/- (किंवा IREPS पोर्टलवर दाखवल्याप्रमाणे). **ऑनलाईन निविदा जमा करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 05/08/2024, 15:00 वाजेपर्यंत**. अधिक तपशिलांसाठी, वरिष्ठ प्रादेशिक विद्युत अभियंता कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी किंवा रेल्वेच्या वेबसाइटवर **(www.ireps.gov.in)** संपर्क साधा.

**निवडक**

## भर मैदानात युवराज चिडला

**बर्मिंगहॅम :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्सच्या अंतिम सामन्यात भारतीय चॅम्पियन्स संघाने पाकिस्तान संघाला धूळ चारल्यानंतरी भारतीय खेळाडू चषक घेऊन सेलिब्रेशन करत होते, त्याचवेळी क्रिकेटपटूंच्या मुलांनीही त्यांचे सेलिब्रेशनचे फोटो क्लिक केले. अशा स्थितीत फोटो क्लिक होत असताना रॉबिन उथप्पा कॅमेराच्या मध्यभागी आला. त्यामुळे युवीचा फोटो कॅमेऱ्यासमोर दिसत नव्हता. हे पाहून युवीने उथप्पाच्या कपाळावर चापट मारली आणि त्याला कॅमेऱ्यापासून दूर जाण्यास सांगितले.

## अभिषेकचा महान विक्रम

**हरारे :** टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात अभिषेकला खातेही उघडता आले नाही. गोलंदाजीतही त्याला यश मिळाले नाही. मात्र, दुसऱ्याच सामन्यात अभिषेकने शतक झळकावले. अभिषेकने केवळ ४६ चेंडूत आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. या फॉरमॅटमध्ये शतक झळकावणारा तो भारतीय संघाचा १०वा फलंदाज ठरला. तसेच, चौथ्या सामन्यात त्याला पहिले यश मिळाले. याच मालिकेत शतक आणि बळी घेणारा अभिषेक भारताचा पहिला खेळाडू ठरला आहे.

## सर्वात महागडा अंतिम सामना

**लंडन :** जगातील सर्वात प्रतिष्ठेची टेनिस स्पर्धा असलेल्या विम्बल्डन ओपनचा अंतिम सामना ऐतिहासिक ठरणारा आहे. जोकोविच आणि अल्कारेझ हे विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने आहेत. यांच्यातील अंतिम सामन्याच्या तिकिटाची किंमत सुमारे ५.८ लाख रुपयांपासून सुरू होते. अंतिम सामन्याच्या सर्वात महाग तिकीटाची किंमत १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. अशाप्रकारे इतिहासातील कोणत्याही टेनिस स्पर्धेतील हा सर्वात महागडा सामना ठरणार आहे. कारण इतकी महागडी तिकिट यापूर्वी कधीही विकली गेली नव्हती.

## स्पेनचे पारडे जड

**बर्लिन :** स्पेनने सलग सहा सामने जिंकून धडाका राखलेला असला तरी पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारलेला इंग्लंडचा संघही तेवढाच धोकादायक आहे. लुईस दे ला फ्युएन्टे यांच्या मार्गदर्शनाखालील स्पेनने स्पर्धेत साखळी फेरीपासून प्रत्येक सामना जिंकलेला आहे. उपांत्य फेरीत त्यांनी फ्रान्सचे कडवे आव्हान मागे सारले. स्पर्धेतील आतापर्यंतची कामगिरी लक्षात घेता स्पेनला चौथ्यांदा युरो करंडक पटकावण्याची जास्त संधी आहे. तसे झाल्यास स्पर्धा सर्वाधिक वेळा जिंकणारा पहिला संघ हा पराक्रम ते साधतील.

## धोनीला स्थान नाही

**नवी दिल्ली :** युवराज सिंगने वर्ल्ड चॅम्पिनयशीप ऑफ लीजंड्स स्पर्धेदरम्यान, त्याची सर्वकालिन सर्वोत्तम प्लेइंग-११ निवडली आहे. त्याने त्याच्या या प्लेइंग-११ मध्ये सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि रोहित शर्मा या तीन भारतीय खेळाडूंना स्थान दिले आहे. यात भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीला स्थान दिले नाही. याव्यतिरीक्त रिकी पॉंटिंग, एबी डिव्हिलियर्स, ॲडम गिलख्रिस्ट, अँड्र्यू फ्लिंटॉफ, शेन वॉर्न, मुथय्या मुरलीधरन, ग्लेन मॅक्ग्रा, वासिम आक्रम, युवराज सिंग (१२ वा खेळाडू) या खेळाडूंना स्थान दिले आहे.

# झिम्बाब्वेला भारताचा 'यशस्वी' तडाखा

**। हरारे । वृत्तसंस्था ।**

**भारतविरुद्ध झिम्बाब्वे संघात शनिवारी (दि.१३) झालेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात भारताने 10 गडी राखत दणदणीत विजय मिळवला. याबरोबरच भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत ३-१ अशी आघाडी घेत मालिकाही खिश्यात घातली आहे. या सामन्यात भारतासमोर झिम्बाब्वेने १५३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे लक्ष्य भारताने एकही गडी न गमावता १५.२ षटकांत १५६ धावा करत पूर्ण केले. यावेळी कर्णधार शुभमन गिल आणि यशस्वी जयस्वाल यांनी दमदार सुरुवात केली होती.**





झिम्बाब्वेच्या १५३ धावांचे लक्ष्य गठताना यशस्वी जयस्वाल एका बाजूने आक्रमक खेळत असताना दुसरी बाजू शुभमन गिलने सांभाळली. त्यानंतर दोघेही खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर दोघांनीही फटकेबाजी सुरू करत अर्धशतके पुर्ण केली. या सामन्यात

### ३-१ अशी आघाडी घेत मालिका खिशात

यशस्वी जयस्वाल शतकाच्या अगदी जवळ होता. मात्र, भारताच्या विजयासाठी आवश्यक असलेल्या धावा पूर्ण झाल्याने तो ५३ चेंडूत १३ चौकार आणि २ षटकारांसह ९३ धावांवर नाबाद राहिला. तसेच, गिलनेही ३९ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारासंह नाबाद ५८ धावा केल्या होत्या. दरम्यान, भारताने नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ बाद १५२ धावा केल्या होत्या. झिम्बाब्वेकडून कर्णधार सिकंदर रझाने २८ चेंडूत ४६ धावांची खेळी केली. तसेच, वेस्ली मधेवेरेने (२५) आणि तादिवानाशे मारुमणी (३२) यांनी छोटेखानी खेळी केल्या. भारताकडून गोलंदाजीत खलील अहमदने २ बळी घेतले, तर तुषार देशपांडे, वॉशिंग्टन सुंदर, अभिषेक शर्मा आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

# कपिल देवच्या प्रयत्नांना यश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचे विश्वविजेते कर्णधार कपिल देव यांनी बीसीसीआयला रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या अंशुमन गायकवाड यांना मदत करण्याचे आवाहन केले होते. ७१ वर्षीय गायकवाड यांच्यावर गेल्या एक वर्षापासून लंडनच्या किंग्ज कॉलेज हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. बीसीसीआयला मदतीची विनंती करण्याव्यतिरिक्त कपिल देव यांनी गायकवाड यांच्या उपचारासाठी आपली पेन्शन दान करण्याचेही आश्वासन दिले होते. आता बीसीसीआयने कपिल देव यांच्या मागणीची दखल घेतली आहे. कपिल देव यांनी बीसीसीआयला आवाहन करताना म्हटले होते की, बीसीसीआयमध्ये अशी व्यवस्था निर्माण करावी, जेणेकरून माजी क्रिकेटपटूंना अशा परिस्थितीत मदतीची गरज भासल्यास बोर्डाने त्यांना मदत करावी.



# निवड चाचणीची गटवारी जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर पश्चिम विरुद्ध औरंगाबाद, परभणी विरुद्ध पिंपरी चिंचवड या पुरुषांच्या सामन्याने ७१व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असो. यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे दि. १५ ते २० जुलै या कालावधीत पुरुष व महिला गटाच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पुरूषांचे सामने मॅटच्या ५ क्रीडांगणावर खेळविण्यात येणार आहेत. या स्पर्धेची गटवारी राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी एका पत्रकाद्वारे सर्व प्रसार माध्यमांना कळविली आहे.

**स्पर्धेची गटवारी :-**

'अ' गट :- मुंबई शहर पश्चिम, पालघर, औरंगाबाद.

'ब' गट :- अहमदनगर, रायगड, सोलापूर, ठाणे.

'क' गट :- मुंबई उपनगर पूर्व, परभणी, उस्मानाबाद, पिंपरी चिंचवड.

'ड' गट :- नांदेड, लातूर, बीड, पुणे शहर.

'इ' गट :- रत्नागिरी, नंदुरबार, जळगाव, नाशिक.

'फ' गट :- धुळे, ठाणे ग्रामीण, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर पश्चिम.

'ग' गट :- नाशिक शहर, पुणे ग्रामीण, हिंगोली, मुंबई शहर पूर्व.

'ह' गट :- सांगली, कोल्हापूर, सातारा, जालना.

# बार्बोराने पटकावले विम्बल्डनचे विजेतेपद

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

झेक प्रजासत्ताकची स्टार टेनिसपटू बार्बोरा क्रेजिकोव्हाने विम्बल्डन २०२४ च्या महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले आहे. लंडनमध्ये शनिवारी (दि.१३) खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात ३१व्या मानांकित क्रेजसिकोव्हाने इटलीच्या ७व्या मानांकित जास्मिन पाओलिनीचा ६-२, २-६, ६-४ असा पराभव केला.

हा अंतिम सामना १ तास ५६ मिनिटे चालला. अंतिम लढतीत क्रेजिकोव्हाने पहिला सेट सहज जिंकला. मात्र, जस्मिनने दुसऱ्या सेटमध्ये दमदार पुनरागमन करत सामना निर्णायक सेटपर्यंत नेला. तिसऱ्या आणि शेवटच्या सेटमध्ये चुरशीची स्पर्धा झाली, ज्यात क्रेज्सिकोव्हाने बाजी मारली.

२८ वर्षीय क्रेजिकोव्हाच हा दुसरा ग्रँड स्लॅम एकेरी अंतिम सामना होता. याआधी तिने २०२१ मध्ये फ्रेंच ओपनचे विजेतेपद पटकावले होते. तर, जस्मिनचा देखील हा दुसरा ग्रँड स्लॅम अंतिम सामना होता. मात्र, यावेळीही तिला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. क्रेजिकोव्हाने उपांत्य फेरीच्या सामन्यात



२०२२ची विम्बल्डन चॅम्पियन एलेना रायबाकिना हिचा ३-६, ६-३, ६-४ असा पराभव केला होता. तर, पाओलिनीने डोना वेकिचचा २-६, ६-४, ७-६ (१०-८) असा पराभव केला. या दोन्ही खेळाडूंनी उपांत्य फेरीत आक्रमक खेळ दाखवला होता.

या वर्षी जास्मिन पाओलिनी सलग दुसरी ग्रँडस्लॅम एकेरीची फायनल खेळत होती. २०१६ नंतर महिला खेळाडूनं एकाच वर्षात फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन ओपनची अंतिम फेरी गाठण्याची ही पहिलीच वेळ आहे. फ्रेंच ओपन २०२४ च्या अंतिम फेरीत पाओलिनीला इगा स्विटेककडून पराभव पत्करावा लागला होता.

# शिबिरात बीसीसीआयच्या पंचांचे मार्गदर्शन

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पंच व स्कोअरर्स परिक्षेसाठीच्या पूर्वतयारीसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असससोसिएशनने बुधवारी (दि.१०) खोपोली येथील महाराजा बँक्वेट हॉल येथे बीसीसीआयचे पंच रोहन इंगवले व स्कोअरर केतकी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व क्रिकेट पंच व स्कोअरर्स यांच्यासाठी शिबिराचे आयोजन केले होते. महाराष्ट्र क्रिकेट असससोसिएशनने यावर्षी राज्यातील पंच व स्कोअरर्सच्या मुख्य परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज आल्याने आधी पूर्वचाचणी परीक्षा(स्क्रीनिंग टेस्ट) घेण्याचे ठरविले आहे. रायगड जिल्ह्यातून पंच परीक्षेसाठी ५६ तर गुणलेखक/स्कोअरर्ससाठी २० उमेदवारांनी परीक्षेसाठी अर्ज केले आहेत.



पूर्वचाचणी परीक्षा २१ जुलै रोजी पुणे येथे एमसीए मार्फत घेण्यात येणार आहे. या परीक्षेत किमान ८०% पेक्षाजास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांनाच मुख्य परीक्षेसाठी बसता येणार असल्याचे एमसीएकडून जाहीर करण्यात आले आहे. यावेळी गतवर्षीच्या राज्यस्तरीय पंच पॅनल परिक्षेत रायगड जिल्ह्यातून उत्तीर्ण झालेले अँड. पंकज पंडित व सुयोग चौधरी यांचा सत्कार आरडीसीए मार्फत करण्यात आला. बीसीसीआयचे पंच रोहन इंगवले व स्कोअरर केतकी नाईक यांनी उपस्थित सर्वांना सुरेख मार्गदर्शन केल्याबद्दल आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक, सदस्य यशवंत साबळे, राजेश पाटील, समीर मसुरकर, ॲड.पंकज पंडित, प्रदिप खलाटे, शंकर दळवी, विनय पाटील, चंद्रकांत म्हात्रे, विनोद सोलंकी यांनी त्यांचे आभार मानले.

# गांगुली दिल्लीचा नवीन प्रशिक्षक?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांच्यातील नाते संपुष्टात आले. पुढील मोसमासाठी लवकरच महालिलाव होणार आहे. त्याअगोदर दिल्ली संघाने पाँटिंग यांना निरोप दिला आहे. गेली सात वर्षे पाँटिंग दिल्ली संघाचे मुख्य प्रशिक्षक होते. २००८ पासून आयपीएलमध्ये खेळणाऱ्या दिल्लीला आजपर्यंत विजेतेपद मिळवता आलेले नाही. दरम्यान, सौरव गांगुली संघाचा नवा मुख्य प्रशिक्षक बनू शकतो, अशा बातम्या येत होत्या. तो सध्या डीसीचे क्रिकेट संचालक आहे. आता सौरव गांगुलीला याबाबत विचारण्यात आले. पाँटिंगला हटवण्याच्या कारणासोबतच त्याने पुढील मुख्य प्रशिक्षकाचे नावही उघड केले.



सौरव गांगुली म्हणाला की, मला पुढच्या वर्षीच्या आयपीएलची योजना आखायची आहे. पुढील वर्षी मेगा लिलाव आहे, त्यामुळे मी आतापासूनच तयारी सुरू करत आहे. कारण मला डीसीला आयपीएलचे विजेतेपद जिंकायचे आहे. पॉन्टिंग गेल्या ७ वर्षांत डीसीला पुढे नेऊ शकला नाही. मला फ्रँचायझींशी बोलावे लागेल आणि त्यांना भारतीय प्रशिक्षकाचा विचार करण्यास सांगावे लागेल.पाँटिंगची जागा कोण घेऊ शकते, असे गांगुलीला विचारले असता तो म्हणाला, मी मुख्य प्रशिक्षक असेल. बघू मी कशी कामगिरी करतो. मला काही नवीन खेळाडूही आणावे लागतील.

# मेस्सी वर्तुळ पूर्ण करणार?



**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

गतवर्षी कोपा अमेरिका करंडक जिंकून लिओनेल मेस्सीने आपल्या मुकुटात आंतरराष्ट्रीय विजेतेपदाचा पहिला तुरा खोवला होता. त्यानंतर विश्वविजेतेपदाचा करंडकही उंचावला आणि या वेळीही कोपा अमेरिका करंडक जिंकून तो वर्तुळ पूर्ण करणार का, याची उत्सुकता फुटबॉल विश्वाला लागून राहिली आहे. कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेत अर्जेंटिना आणि कोलंबिया यांच्यात अंतिम सामना होत आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार सोमवारी सकाळी ५.३० वाजता ही अंतिम लढत सुरू होणार आहे.

अर्जेंटिनाने थाटात अंतिम फेरी गाठली होती. उपांत्य सामन्यात त्यांनी कॅनडाचे आव्हान मोडून काढले होते. यात मेस्सीचा गोल निर्णायक ठरला. तर, दुसऱ्या उपांत्य सामन्यात १० खेळाडूंसह खेळणाऱ्या कोलंबियाने उरुग्वेवर मात केली. या सामन्यातून कोलंबियाचा स्टार खेळाडू जेम्स रॉड्रिगेझने आपले नाव इतिहासात लिहिले. कोपा अमेरिका स्पर्धेत गोलांसाठी सहाय्य करण्याचा विक्रम त्याने मेस्सीला मागे टाकून मोडला. या स्पर्धेत त्याने सहा गोलांना सहाय्य केले. २०२१च्या स्पर्धेत मेस्सीने पाच गोलांना सहाय्य करण्याचा विक्रम केला होता.

अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचे पारडे जड असले तरी कोलंबियाचा संघ धसमुसळ्या खेळासाठी प्रसिद्ध आहे. उरुग्वेविरुद्धच्या सामन्यात त्यांनी मर्यादा ओलांडल्या होत्या. त्यांचे प्रशिक्षक नेस्टॉर लॉरेन्झो यांनी उपांत्य फेरीच्या त्या सामन्यात राखीव खेळाडू खेळवण्याची संख्या मर्यादित ठेवली होती. रॉड्रिगेझला तर त्यांनी ६२व्या मिनिटाला मैदानात आणले होते. अर्जेंटिनाचा संघ हा पारंपरिक खेळ करणारा संघ आहे.


## वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स ट्रॉफीवर कब्जा

### पाकिस्तान चॅम्पियन्सला दणका

# जगज्जेता भारतच!

**। बर्मिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

**वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा ५ गडी राखून पराभव केला आहे. यासह युवराज सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय चॅम्पियन्स संघाने वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स ट्रॉफीवर कब्जा केला आहे. भारत चॅम्पियन्सने अंतिम सामन्यात जबरदस्त कामगिरी करत पाकिस्तान चॅम्पियन्सचा दारुण पराभव केला. इंडिया चॅम्पियन्सचा सलामीचा फलंदाज अंबाती रायुडूला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून निवडण्यात आले. अंबाती रायडूने अंतिम सामन्यात भारतीय चॅम्पियन संघाच्या विजयाचा पाया रचला होता.**



बर्मिंगहॅम येथे शनिवारी खेळल्या गेलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत चॅम्पियन्सने प्रथम गोलंदाजी करत पाकिस्तान चॅम्पियन्सला २० षटकांत ६ गडी गमावून १५६ धावांवर रोखले. भारतीय चॅम्पियन्ससाठी वेगवान गोलंदाज अनुरीत सिंगने सर्वाधिक ३ बळी घेतले. याशिवाय इंडिया चॅम्पियन्सकडून विनय कुमार, पवन नेगी आणि इरफान पठाण यांनी प्रत्येकी १ बळी घेतला आहे. पाकिस्तान चॅम्पियन्सकडून शोएब मलिकने ३६ चेंडूंचा सामना करताना सर्वाधिक ४१ धावा केल्या ज्यामध्ये त्याने तीन षटकार ठोकले.

प्रत्युत्तरात भारतीय चॅम्पियन्सने १९.१ षटकांत ५ गडी गमावून १५९ धावा करत विजयाची नोंद केली. भारत चॅम्पियन्स संघासाठी, अंबाती रायडूने अंतिम सामन्यात ३० चेंडूत ५० धावा केल्या.

रायडूने आपल्या खेळीत ५ चौकार आणि २ षटकार मारले. याशिवाय गुरकीरत सिंग मानने ३४ आणि युसूफ पठाणने ३० धावा केल्या. पाकिस्तानकडून आमिर यामीनने दोन बळी घेतले. याशिवाय सईद अजमल, वहाब रियाझ आणि शोएब मलिक यांना प्रत्येकी १ बळी मिळाला.


श्री. सुरेश आत्माराम पाटील
नवेदर बेली
यांना ७१ वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
अमरदिप सुरेश पाटील
पुनम अमरदिप पाटील
धीरज पाटील (नातू)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)